सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. २२ फेब्रुवारी २०२६ | वर्ष - ३२ | अंक ३१६ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### नाशिकमधील तरुणीच्या हत्येचे गूढ उकलले

**नाशिक :** वाडीवऱ्हे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सारूळ शिवारात आढळलेल्या अनोळखी तरुणीच्या मृतदेहाचे गूढ उकलण्यात नाशिक पोलिसांना यश आलं आहे. चारित्र्याच्या संशयावरून तिच्याच एका मित्राने दोन साथीदारांच्या मदतीने चालत्या गाडीत चाकूने वार करून तिची हत्या केल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झालं असून, मुख्य आरोपीसह अन्य एकाला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, २० फेब्रुवारी २०२६ रोजी सारूळ शिवारातील निर्जनस्थळी एका १६ वर्षीय मुलीचा मृतदेह आढळला होता. वाडीवऱ्हे पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली. दरम्यान, अकोला येथील सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एका बेपत्ता मुलीच्या तक्रारीवरून मृताची ओळख पटली असून मयत तरुणी मूळची बुलढाणा जिल्ह्यातील असल्याचं निष्पण्ण झालं आहे.

### अहमदनगरमध्ये सीआरपीएफ जवानांचा ट्रक कालव्यात कोसळला

**अहमदनगर:** श्रीनगर येथे केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या बुलेटप्रूफ वाहनाचा भीषण अपघात झाला. अहमदनगर परिसरातील डगपोरा-उमरहैर रोडवर वाहन अनियंत्रित होऊन कालव्यात कोसळल्याने ९ जवान जखमी झाले आहेत.प्राथमिक माहितीनुसार, वाहनावरील नियंत्रण सुटल्यामुळे ही दुर्घटना घडली. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक पोलीस आणि नागरिक घटनास्थळी धावले. त्यांनी तत्काळ बचावकार्य सुरू करून जखमी जवानांना वाहनातून बाहेर काढले आणि जवळच्या रुग्णालयात दाखल केले.या बुलेटप्रूफ वाहनात एकूण ९ जवान प्रवास करत होते. सर्व जखमींवर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. अपघातग्रस्त वाहन क्रेनच्या मदतीने कालव्यातून बाहेर काढण्याचे काम सुरू आहे.

# दिल्लीत मोठ्या दहशतवादी हल्ल्याचा इशारा

## लष्कर-ए-तोयबाकडून लाल किल्ला, चांदणी चौक आणि प्रमुख मंदिर रडारवर

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** होळीच्या आधी, राष्ट्रीय राजधानी दिल्लीत मोठ्या दहशतवादी हल्ल्याचा इशारा जारी करण्यात आला आहे. गेल्या नोव्हेंबरमध्ये लाल किल्ल्याजवळ झालेल्या स्फोटानंतर, दिल्लीत पुन्हा एकदा मोठ्या दहशतवादी हल्ल्याची भीती वाढली आहे.

गुप्तचर माहितीच्या आधारे, दिल्लीत मोठ्या दहशतवादी हल्ल्याचा इशारा जारी करण्यात आला आहे, ज्यामुळे सुरक्षा यंत्रणांना हाय अलर्टवर ठेवण्यात आले आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, लष्कर-ए-तैयबा (एलईटी) लाल किल्ला, चांदणी चौक आणि प्रमुख मंदिरांना आयईडी स्फोटांनी लक्ष्य करण्याची योजना आखत आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ६ फेब्रुवारी रोजी पाकिस्तानातील इस्लामाबादमधील एका मशिदीत बॉम्बस्फोट झाला होता, ज्यामध्ये अनेक लोक मृत्युमुखी पडले होते. तेव्हापासून, लष्कर-ए-तैयबा (एलईटी) भारतात हल्ल्याची योजना आखत आहे. लष्कर-ए-तैयबा (एलईटी) ही दहशतवादी संघटना दिल्लीत आयईडी हल्ला करण्याची योजना आखत असल्याचे वृत्त आहे.

गुप्तचर सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, लष्कर-ए-तैयबाचे दहशतवादी लाल किल्ला आणि चांदणी चौकाजवळ स्फोट घडवण्याची योजना आखत आहेत. चांदणी चौकातील प्रमुख मंदिराला दहशतवाद्यांनी विशेषतः लक्ष्य केले आहे. डरीहझरी श



ढरळलर:

सुरक्षा यंत्रणांना इनपुट मिळताच सुरक्षा वाढवण्यात आली. दिल्ली पोलिस आणि केंद्रीय यंत्रणांनी लाल किल्ला, चांदणी चौक आणि आसपासच्या धार्मिक स्थळांची सुरक्षा अधिक मजबूत केली आहे. पोलिस आणि सुरक्षा दल गर्दीच्या ठिकाणी विशेष लक्ष ठेवून आहेत.

१० नोव्हेंबर २०२५ रोजी संध्याकाळी वाहतुकीतून जात असताना एका कारचा स्फोट झाला. अनेक वाहनांना आग लागली. या अपघातात अनेक लोकांचा मृत्यू झाला. स्फोटापूर्वी तीच कार लाल किल्ल्याच्या पार्किंगमध्ये ३ तास उभी होती. या दहशतवादी हल्ल्यानंतर सुरक्षा यंत्रणांनी दिल्लीसह देशभरात छापे टाकले आणि अनेक लोकांना अटक करण्यात आली.

## सहलींचे स्वस्त पॅकेज महागात!
## आकर्षक जाहिरातींची भुरळ; तिकीट, रिसॉर्ट, व्हिला बुकिंगच्या नावाने फसवणूक

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २१ फेब्रुवारी :** दहावी, बारावीच्या बोर्डाच्या परीक्षा सुरू आहेत. पाठोपाठ शाळांमधील इतर विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरू होतील. त्या संपताच उन्हाळी सुट्ट्यांना सुरुवात होईल. त्यामुळे नातेवाईक, मित्रमंडळी, मुलांना सोबत घेऊन फिरायला जाण्याचे बेत आखले जात आहेत.

ऐनवेळी पंचाईत होऊ नये म्हणून आतापासूनच डव्हान्स बुकिंग सुरू झाले आहे. ही संधी साधत कमी दरात तिकीट, रिसॉर्ट, व्हिला, हॉलिडे पॅकेजच्या नावाखाली फसवणुकीच्या घटना मुंबईत समोर येत आहेत.

विलेपार्ले येथील एका क्लबमध्ये बहुतांश सदस्य हे ज्येष्ठ नागरिक असून त्यांनी आपल्या कुटुंबासह आसाम आणि मेघालय येथे जाण्याचे ठरविले होते. यातील काही जण राहुल जैन असे नाव सांगणाऱ्या हॉलिडे प्लॅनरच्या संपर्कात आले. क्लबच्या सदस्यांनी राहुल याची भेट घेतली. राहुल याने पॅकेजची माहिती देत प्रत्येकी ७५ हजार रुपये खर्च येईल, असे सांगितले. यामध्ये प्रवास, राहणे, खाणे आणि प्रेक्षणीय स्थळांना भेटी यांचा समावेश असल्याचे राहुल याने सांगितले.

केज परवडणारे असल्याने सर्वांनी यासाठी होकार दिला. राहुल याने रक्कम तीन टप्प्यांत देण्यास सांगितले. त्यानुसार ६० सदस्यांनी मिळून ३३ लाख रुपये राहुल याला पाठवले. मात्र तिकीट, हॉटेल बुकिंग याबाबत काहीच माहिती मिळत नसल्याने सदस्यांनी त्याच्याकडे विचारणा केली. मेघालय आणि आसाममध्ये मुसळधार पाऊस असल्याने पॅकेज रद्द करावे लागणार असल्याचे सांगत राहुल याने धनादेश दिले. मात्र हे धनादेश बाउन्स झाल्यानंतर सर्वांनी वाकोला पोलिस ठाण्यात तक्रार केली.

काळाचौकी येथे राहणाऱ्या एका गारमेंट व्यावसायिकाने २० जणांसह थायलंड येथे फिरायला जाण्याचे ठरविले. यासाठी परिचयातील असलेल्या अमित आणि अभिसत्यम झा या दोन एजंटशी संपर्क साधला. त्यांनी एका व्यक्तीचे ५५ ते ५७ हजार रुपये होतील, असे सांगितले. सवलत देऊन सर्वांच्या पॅकेजसाठी नऊ लाख ८० हजारांचा खर्च सांगण्यात आला. यामध्ये विमानाचे तिकीट, फिरणे, खाणे आणि राहणे यांचा समावेश होता. व्यावसायिकाने यासाठी होकार देत सर्व रक्कम पोहोच केली. मात्र अमित आणि अभिसत्यम यांच्याकडून काहीच प्रतिसाद मिळत नसल्याने अधिक माहिती घेतली असता, दोघांनी त्यांचे बुकिंगच केले नसल्याचे समोर आले.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी २ दिवसाच्या इस्रायल दौऱ्यावर जाणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या २५-२६ फेब्रुवारी रोजी दोन दिवसांच्या इस्रायल दौऱ्यावर जाणार आहेत. या भेटीपूर्वी, भारत आणि इस्रायल हे दोन्ही देश संरक्षण आणि धोरणात्मक सहकार्य आणखी मजबूत करण्याची तयारी करत आहेत. दोन्ही देश नवीन संरक्षण तंत्रज्ञानावर संयुक्तपणे सहकार्य करण्याचा प्रयत्न करत आहेत.भारतीय इतिहास पुस्तके

या भेटीदरम्यान सुरक्षा सहकार्याबाबत सामंजस्य करार (एमओयू) होण्याची अपेक्षा आहे. परंतु, दोन्ही देशांमधील संरक्षण सहकार्य आधीच सुरू असल्याने कोणतेही मोठे संरक्षण करार केले जाणार नाहीत. येत्या काळात हे सहकार्य अंदाजे १० अब्ज डॉलर्सचे असण्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

एका इंग्रजी वर्तमानपत्राच्या वृत्तानुसार, इस्रायल भारताला नवीन संरक्षण तंत्रज्ञान देण्यास तयार आहे. यामध्ये लेसर-आधारित संरक्षण प्रणाली, लांब पल्ल्याची क्षेपणास्त्रे आणि ड्रोनचा समावेश आहे. असे वृत्त आहे की इस्रायल यापूर्वी कधीही न पुरवलेले तंत्रज्ञान देखील सामायिक करू शकते.

संरक्षणाव्यतिरिक्त, दोन्ही देश विज्ञान, शेती, स्वच्छ पाणी आणि क्वांटम संगणनासारख्या नवीन तंत्रज्ञानावर देखील चर्चा करतील. पंतप्रधान मोदी आणि इस्रायली पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्यात चांगले संबंध असल्याचे मानले जाते. दोन्ही देश दहशतवादाविरुद्ध समान भूमिका घेतात.

## धक्कादायक! केमिस्ट्रीचा पेपर फुटला?

**तभा वृत्तसेवा**

**नागपूर, दि. २१ फेब्रुवारी :** परीक्षा सुरक्षेबाबत कडक उपाययोजना केल्याचे दावे होत असतानाच नागपुरात रसायनशास्त्राची प्रश्नपत्रिका परीक्षा सुरू होण्यापूर्वीच व्हॉट्सॲपवर प्रसारित झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सेंट उर्सुला हायस्कूलच्या परीक्षा केंद्रावर सतर्क पर्यवेक्षकामुळे हा प्रकार उघडकीस आला असून, दोन विद्यार्थिनींची चौकशी सुरू आहे.

बुधवारी रसायनशास्त्राचा पेपर सुरू असताना एका विद्यार्थिनीच्या हालचालींवरून पर्यवेक्षक शिक्षिकेला संशय आला. संबंधित विद्यार्थिनी वारंवार प्रसाधनगृहात जात असल्याचे लक्षात येताच तिची तपासणी करण्यात आली. त्यावेळी तिच्याकडून स्मार्टफोन जप्त करण्यात आला. मोबाईलची पाहणी केली असता, परीक्षा सुरू होण्यापूर्वीच एका व्हॉट्सॲप ग्रुपवर प्रश्नपत्रिका शेअर झाल्याचे आढळले. त्याच ग्रुपवर संभाव्य उत्तरांचाही आदानप्रदान झाल्याचे समोर आले.

केंद्रप्रमुखांनी तत्काळ पोलिसांना कळविल्यानंतर विद्यार्थिनीची चौकशी करण्यात आली. तिच्या जबाबावरून आणखी एका विद्यार्थिनीची चौकशी




करण्यात आली. प्राथमिक तपासात एका खाजगी शिकवणीशी संबंधित व्यक्तीने पैशांच्या मोबदल्यात प्रश्नपत्रिका उपलब्ध करून दिल्याचा संशय व्यक्त होत आहे. पोलिसांनी संबंधिताविरुद्ध गुन्हा नोंदवून मोबाईल व ग्रुपमधील संदेशांचा तांत्रिक तपास सुरू केला आहे. ही प्रश्नपत्रिका नागपूरमधील केवळ एका केंद्रापुरती मर्यादित नसून राज्यातील इतर भागांपर्यंतही पोहोचल्याची शक्यता तपासली जात आहे. प्रश्नपत्रिका नेमकी कुठून बाहेर पडली, त्यासाठी कोणते तांत्रिक माध्यम वापरण्यात आले आणि या जाळ्यात आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा सखोल तपास सुरू आहे.

दरम्यान, या घटनेमुळे परीक्षा प्रक्रियेतील सुरक्षाव्यवस्थेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले असून, जबाबदारांवर कडक कारवाईची मागणी होत आहे.

## मुंबईत पुन्हा धावणार मोनोरेल!

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २१ फेब्रुवारी :** सेवेत दाखल झाल्यापासूनच मुंबईमधील मोनोरेल तोट्यात होती. २० सप्टेंबर २०२५ रोजी चचठऊ-ने मोनोरेल सेवा अनिश्चित काळासाठी बंद करण्याचा निर्णय घेतला होता. सतत होणाऱ्या तांत्रिक बिघाडांमुळे गेल्या ८ वर्षांत मोनो सेवा तात्पुरती बंद करण्याची ही एमएमआरडीएची तिसरी




वेळ होती. आता मुंबईकरांसाठी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. मुंबईत पुन्हा मोनोरेल धावणार असल्याची घोषणा काल एमएमआरडीएने आपल्या अधिकृत एक्स अकाऊंटवरून केली आहे.

२०२५ मध्ये ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात पावसामुळे मोनोरेल सेवा तीन वेळा ठप्प झाली होती. १५ सप्टेंबर रोजी मुसळधार पावसामुळे मोनोरेल तांत्रिक बिघाडामुळे अचानक ठप्प झाली. दरम्यान, १९ ऑगस्ट रोजी गर्दीमुळे मोनोरेल अचानक बंद पडली आणि ५००हून अधिक प्रवासी त्यामध्ये अडकले होते. यामुळे प्रवाशांचे सतत हाल होत होते. या सततच्या बिघाडांमुळे मोनो सेवा अनिश्र्चित काळासाठी बंद करण्यात आली होती. मुंबईकरांच्या दैनंदिन प्रवासाला यामुळे मोठा फटका बसला होता. चेंबूर ते जेकब सर्कल धावणाऱ्या या मोनोरेलवर मुंबईकर मोठ्या संख्येने प्रवास करत होते.

# आग्रा येथे शिवरायांचे भव्य स्मारक उभारणार : मुख्यमंत्री फडणवीस

**आग्रा/वृत्तसंस्था :** छत्रपती शिवाजी महाराज आग्ऱ्यामध्ये ज्या ठिकाणी कैदेत होते आणि जिथून त्यांनी आपल्या बुद्धिमत्तेने व गनिमी काव्याने ऐतिहासिक सुटका करून घेतली, त्या ठिकाणी शिवरायांचे भव्य स्मारक उभारणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी केली. तसेच एनसीआरटीच्या पुस्तकांत मुघलांचा इतिहास नाही; तर छत्रपती शिवरायांच्या साहसी पराक्रमाचा जाज्वल्य इतिहास शिकवला जाईल. शिवरायांच्या इतिहासावर २० पाने या नव्या पुस्तकांमध्ये देण्यात येत आहेत. हे पंतप्रधान मोदी यांच्यामुळे शक्य झाल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. आग्ऱ्याच्या ऐतिहासिक लाल



किल्ल्यात आयोजित करण्यात आलेल्या युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या दिमाखदार सोहळ्यात ते बोलत होते.

यावेळी मंचावर राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे, केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील, उत्तर प्रदेशचे मंत्री योगेंद्र उपाध्याय, राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार आणि या कार्यक्रमाचे मुख्य संयोजक विनोद पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, छत्रपती शिवरायांच्या स्मारकासाठी महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश सरकार यासाठी संयुक्तपणे काम करत आहे.

या ऐतिहासिक जागेच्या अधिग्रहणासाठी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी त्यांच्या मंत्रिमंडळाच्या माध्यमातून अत्यंत तत्परतेने निर्णय घेतला, याबद्दल त्यांचे व उत्तर प्रदेश सरकारचे विशेष आभार. सध्या या अधिग्रहणाची कायदेशीर कारवाई अंतिम टप्प्यात आली असून, पुढील वर्षी जेव्हा आपण शिवजयंतीसाठी येथे येऊ, तेव्हा त्या ठिकाणी प्रत्यक्ष स्मारक उभारणीची तयारी सुरू झालेली असेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

छत्रपती शिवाजी महाराज आणि हिंदवी स्वराज्याच्या देदीप्यमान इतिहासासाठी केवळ एकच परिच्छेद दिला होता, असे सांगत फडणवीस म्हणाले, पंतप्रधान मोदींमुळे शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची २० पाने अभ्यासक्रमात सहभागी करण्यात आली आहेत.

**शिवरायांच्या शौर्याचे दर्शन**

आग्रा येथील या शिवजयंती सोहळ्यात पुण्यातील विवेक पाटील यांनी आग्रा किल्ला, उत्तर प्रदेश येथे निऑन लाईट्स आणि लेझर शोच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्याचे व कार्यकर्तुत्वाचे दर्शन घडविणाऱ्या प्रसंगांचे भव्य सादरीकरण केले.



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# संक्षिप्त...

## दक्षिण शेंद येथे शिवजयंती साजरी



**शिरूर अनंतपाळ :**दक्षिण शेंद येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सेंड दक्षिण येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी शिवरायांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी गावातील तंटामुक्ती अध्यक्ष श्री. बजरंग मोरे साहेब, चेअरमन श्री. कल्याण पाटील, श्री. कृष्णा शिंदाळ, अंगणवाडी सेविका शुभांगी गोकणे, श्रीमती श्रद्धा मोरे, आशा कार्यकर्त्या आयोध्या गोकणे तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक श्री. बळते सर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी शिवचरित्रावर भाषणे, देशभक्तीपर गीते आणि घोषवाक्ये सादर करून उपस्थितांची मने जिंकली. मान्यवरांनी आपल्या मनोगतातून शिवरायांच्या पराक्रम, स्वराज्य स्थापनेतील योगदान आणि आदर्श कार्याचा उल्लेख करत विद्यार्थ्यांना त्यांच्या विचारांचा आदर्श ठेवण्याचे आवाहन केले.कार्यक्रमामुळे शाळा परिसरात देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाचे आयोजन शाळा प्रशासन व ग्रामस्थ यांच्या सहकार्याने यशस्वीरीत्या पार पडले.

## श्रीराम विद्यालयात दहावीच्या परीक्षार्थीचे स्वागत



**रेणापूर :** शुक्रवार पासून इयत्ता दाहावी च्या परीक्षेची सुरुवात झाली .श्रीराम विद्यालय रेणापूर येथील दहावीच्या परीक्षा केंद्रावर विद्यार्थी पालकांची उपस्थिती होती. या परीक्षा केंद्रावर एकून ३४७ परीक्षार्थी परीक्षा देत आहेत या केंद्राचे केंद्रसंचालक प्राचार्य सिद्धेश्र्वर मामडगे,पर्यवेक्षक अनिल कुटवाड, प्राध्यापक जुबेर खान पठाण, जिल्हा परिषद प्रशाला खरोळाचे मुख्याध्यापक अजय रेणापूरे,सांस्कृतिक विभाग प्रमुख अमृतेश्र्वर स्वामी यांची उपस्थिती होती. दाहावी परीक्षार्थी विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले. महाराष्ट्र शासनाच्या वतीने कॉपीमुक्त अभियान राबविले जात आहे =. विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्यासाठी व पारदर्शी परीक्षेसाठी शासन प्रयत्नशील आहे. त्याचाच भाग म्हणून विद्यार्थ्यास गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले व परीक्षेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## सोमनाथपूरमध्ये गळफास घेऊन एकाची आत्महत्या

**उदगीर :** सोमनाथपूर येथील इच्छापूर्ती शिवबा नगर येथे शुक्रवारी (दि. २०) दुपारी एका ५५ वर्षीय व्यक्तीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. मयत कल्लप्पा हणमंतराव बिरादार (वय ५५, रा.इच्छापुर्ती शिवबा नगर सोमनाथपुर ता. उदगीर) यांनी शुक्रवारी दुपारी १२. ४५ वाजताच्या सुमारास गायरानामध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. आत्महत्येचे कारण समजू शकले नाही. याबाबत ललीता कल्लप्पा बिरादार यांनी पोलिसात दिलेल्या माहितीवरून अकस्मात मृत्यू क्रमांक १२ /२६ कलम १९४ बीएनएसएस प्रमाणे नोंद घेण्यात आली आहे. घटनेच्या अनुषंगाने पुढील तपास सुरू असल्याचे पोलीस निरीक्षकांनी सांगितले.

## चिमुकलीचा पहिला रोजा

**वलांडी :** देवणी तालुक्यातील वलांडी येथील सहा वर्षांच्या फाइजा शेख हिने रमजान महिन्यातील पहिला रोजा पूर्ण करून सर्वांचे लक्ष वेधले आहे. एवढ्या लहान वयात तिने दिवसभर उपवास पाळत धार्मिक परंपरेप्रती निष्ठा आणि संयम दाखवला. रमजान महिन्यात रोजा, नमाज आणि गरजूंची मदत याला विशेष महत्त्व असते. सूर्योदयापूर्वी सहरी तर सूर्यास्तानंतर इफ्तार करून रोजा सोडला जातो. कडक उन्हातही फाइजा हिने रोजा पूर्ण केल्याने तिच्या जिद्दीचे कौतुक होत आहे. कुटुंबीय आणि ग्रामस्थांनी तिचे अभिनंदन केले. तिच्या कृतीतून श्रद्धा, संयम आणि चांगल्या संस्कारांचा प्रेरणादायी संदेश मिळत आहे.

## साहित्यिक विलास सिंदगीकर यांना अभिरुची गौरव पुरस्कार

**जळकोट :** येथील क्रांती माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक आणि ख्यातनाम साहित्यिक विलास सिंदगीकर यांच्या 'सणोत्सव' या बालकवितासंग्रहास गुजरातमधील बडोदा येथील मराठी वाङ्मय परिषद, बडोदे संस्थेचा 'अभिरूची गौरव बालसाहित्य पुरस्कार-२०२५' जाहीर झाला आहे. २२ मार्च रोजी बडोदा येथे होणाऱ्या एका विशेष समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल.सिंदगीकर हे गेल्या ३० वर्षांपासून साहित्य आणि शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत. सणोत्सव या संग्रहातून त्यांनी बालमनावर संस्कार करणारी कविता मांडली आहे. या पुरस्काराचे स्वरूप २५०० रुपये रोख, सन्मानचिन्ह, मानपत्र आणि शाल-पुष्पहार असे आहे. १९३१ पासून कार्यरत असलेल्या बडोद्याच्या या प्रतिष्ठित संस्थेचा पुरस्कार जाहीर झाल्याने सिंदगीकर यांच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्यांच्या या यशाबद्दल साहित्य वर्तुळातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# जल जीवन मिशन योजना कागदावरच

## उन्हाळा तोंडावर असल्याने पाण्याची समस्या गंभीर होण्याची शक्यता

**तभा वृत्तसेवा/बालाजी गायकवाड**
**किनगाव, दि. २१ फेब्रुवारी :**
किनगावची लोकसंख्या लक्षात घेऊन अनेक वर्षांपूर्वी गावाला पाणी मिळावे यासाठी पाणीपुरवठा योजना किनगाव पासुन साधारणता ११ कि . मीटर अंतरावर असलेल्या व्हटी मध्यम प्रकल्पातून राबविण्यात आली होती.ती योजना आता कालबाह्य झाली आहे. गावाचा विस्तार लक्षात घेऊन नवीन पाईपलाईन मंजूर करण्यात आली, त्याचे काम अर्धवट झाले असून काम अद्यापही पूर्ण झाले नाही.तत्काळ काम पूर्ण करून गावाला पाणी मिळावे यासाठी सबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालून कंत्राटदारास आदेश देण्यात यावेत अशी मागणी नागरिकांतून केली जात आहे.

अहमदपुर तालुक्यातील सर्वात मोठी बाजारपेठेचे गाव म्हणून किनगावची तालुक्यातच नव्हे तर जिल्हयात ओळख आहे.गावाची गरज लक्षात घेऊन पूर्वीच्या अहमदपूर व आताच्या रेणापूर तालुक्यातील व्हटी मध्यम प्रकल्पातून किनगाव येथील नागरिकांसाठी स्टँड पोस्ट योजना अमलात आली होती.

या स्टँड पोस्ट योजनेचे पुढे रूपांतर नळ योजनेत झाले.गावाचा विस्तार वाढत गेला सध्या गावाची लोकसंख्या तीस ते पस्तीस हजारच्या जवळपास झाली आहे. १९९२ च्या दरम्यान करण्यात आलेली ही जुनी पाईपलाईन योजना कुचकामी ठरत आहे. जागोजागी पाईपलाईन फुटून पाणी गळती होत आहे.त्यामुळे किनगावकरांचे पाण्यासाठी हाल - बेहाल होत आहेत.

जलजीवन मिशन योजने अंतर्गत किनगांव व २ गावांच्या पाणीपुरवठा योजनेस मंजुरी मिळाली व सन २०२१/२०२२ मध्ये निविदा निघाली. त्यानंतर दोन वर्षाच्या जवळपास संबंधित गुत्तेदार यांनी काम पूर्ण करणे गरजेचे होते.मात्र प्रत्येक वेळी वेग वेगळे कारणे देऊन संबंधित विभागाचे अधिकारी व संबंधित गुत्तेदार हे कामात वेळ काढू पणा करीत असल्याचे सांगीतले जाते. गेल्या चार वर्षापासून कासव गती पेक्षाही कमी गतीने गुत्तेदार काम करीत असल्याचे दिसत आहे.

संबंधित गुत्तेदार यांना कामाला गती देण्याचे आदेश देणे गरजेचे आहे. पुढील महिन्यापासून उन्हाळ्याचे चटके बसण्यास सुरुवात होईल.पाण्याची कमतरता पहायला मिळेल.जुनी पाईपलाईन कुचकामी झाली असल्याने पाणीपुरवठा व्यवस्थित होत नसल्याने गावाला पाणी मिळणे अवघड झाले आहे.नवीन पाईपलाईनचे काम पूर्ण करून तत्काळ किनगावला पाणी पुरवठा सुरू करण्याकरिता संबंधित विभागाचे अधिकारी व गुत्तेदार यांनी प्रयत्न करावेत अन्यथा गावच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होऊन गावकऱ्यांच्या रोषाला सामोरे जाण्याची वेळ प्रशासनावर येईल.अनेक



भागात पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांना पाण्यासाठी बोर व विहिरीचा आणि टँकरचा आधार घ्यावा लागत आहे. पाणी पुरवठा योजनेचे काम कासव गतीने होत असल्याने नागरिकात संताप पाहायला मिळत आहे .....

# प्रथमच ए आय या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा चा वापर

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि. २१ फेब्रुवारी :** सोयाबीन पिकातून शेतीतून अपेक्षित उत्पन्न हाती लागत नसल्याने वर्षे भर कुंटूबाचा आर्थिक गाडा ओढताना दररोज घरातील अनेक समस्यांना आर्थिक तोंड द्यावे लागत असल्याने येरोळ येथील शेतकरी बालाजी पाटील साकोळकर यांनी शासनाच्या योजनेतून शेतीत पन्नास फुट खोल विहीर घेतली असून विहीरीला चांगले पाणी लागले त्या पाण्यावर यंदा शेतीत नवीन चार एकर ऊसाची लागवड केली असून बागायतीती ऊस शेतीतून भरघोस उत्पादन घेण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती विकसीत करण्याच्या हेतूने ऊस शेतीमध्ये ऐ आय टेक्नॉलॉजी चे याजिंक किट बसविले असून शिरूर अनंतपाळ तालुक्यातील पहिला प्रयोग शेतकरी बालाजी राम साकोळकर यांनी केले आहे.



बालाजी साकोळकर यांनी पाच फुटाचा बेड तयार करून ऊस लागवड केली असून बेडवर अंतर्गत हरभरा पिक घेतले आहे बालाजी साकोळकर यांचे वडिल रामराम साकोळकर शेतीत मोठी मेहणत घेत सतत वेगवेगळे भाजीपाला बागायती पिक घेतात त्यांच्याकडे एक एकर पेरूची बाग असून यंदा त्यातून त्यांना जवळपास एक लाख नफा मिळाला आहे. यंदा चार एकर नवीन ऊस लागवड केली असून यातून चांगले उत्पन्न घेण्यासाठी मोठा खर्च करून ऐ आय किट बसविले आहे ऐ आय हे मोबाईल जोडले जाते ऐआय शेतातील ऊन वारा, पाणी व खत व्यवस्थापन, किड रोग याची वेळोवेळी मार्गदर्शन करते जमिनीची प्रत नुसार खताचे नियोजन सांगते वेळोवेळी खत पाणी व्यवस्थापन व मेहणतीचे कामे केल्यामुळे ऐआय टेक्नॉलॉजी मुळे शेतीचे उत्पन्न हमखास वाढते असे मत शेतकरी बालाजी महाराज साकोळकर यांनी सांगितले.

यावेळी सरपंच सतिश सिंदाळकर, गुडेराव चौसष्टे, ऋषिकेश सिंदाळकर, ज्येष्ठ पत्रकार शिवानंद भुसारे, दिपक दाते, रामराम साकोळकर उपस्थित होते. फोटो ओळी, शेतकरी बालाजी महाराज साकोळकर यांच्या ऊस शेतीत ऐ आय आधुनिक टेक्नॉलॉजी यंत्र बसविण्यात आले आहे. यावेळी सरपंच सतिश सिंदाळकर यांच्या सह शेतकरी उपस्थित होते

# शिवजन्मोत्सव सोहळा उत्साहात

## शिवकालीन शस्त्र प्रदर्शन, पाळणा कार्यक्रमास शिवभक्तांचा प्रचंड प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि. २१ फेब्रुवारी :** निलंगा येथे सर्वधर्मीय शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती अत्यंत उत्साहात आणि विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी आयोजित रक्तदान शिबीरात शहरातील १२१ शिवभक्तांनी रक्तदान केले.

छत्रपती शिवाजी महाराज चौकात पार पडलेल्या या सोहळ्यात सायंकाळी सहा वाजल्यापासून सांस्कृतिक कार्यक्रमांची मोठी मेजवानी रंगली होती. शहरातील विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी शिवरायांच्या पराक्रमावर आधारित गीतांवर बहारदार नृत्ये सादर केली. तर अनेक चिमुकल्यांनी आपल्या भाषणातून शिवरायांच्या विचारांचा वारसा जपण्याचे आवाहन केले.

'आम्ही जिजाऊच्या लेकी'चा पोवाडा आणि पाळणा...

लातूर येथील 'आम्ही जिजाऊच्या लेकी' या १६ महिलांच्या पथकाने सादर केलेले शिवचरित्र, पोवाडे आणि स्फूर्तीगीतांनी अवघे निलंगा शहर शिवमय झाले होते. कार्यक्रमाच्या शेवटी या महिलांनी छत्रपती शिवरायांचा पाळणा गायला, ज्याला उपस्थित हजारो शिवभक्तांनी उत्स्फूर्त दाद दिली.

निलंगा शहरात पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा यावेळी समितीच्या वतीने गौरव करण्यात आला. यामध्ये:माधव पिटले व परमेश्र्वर शिंदे: यांना'स्वराज्य मित्र' पुरस्कार देण्यात आला तर राधाकृष्ण फाउंडेशनचे प्रमुख आकाश सोळुंके: यांना'स्वराज्य रत्न' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

या सोहळ्याला निलंगा शहरातील माता-भगिनी, युवक आणि शिवभक्त हजारोच्या संख्येने उपस्थित होते. सर्वधर्मीय शिवजन्मोत्सव समितीच्या या यशस्वी नियोजनाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. राजमाता जिजाऊ चौकात दत्ता मोहोळकर यांच्या पुढाकारातून शिवकालीन शस्त्रसाठा विद्यार्थी व शहरातील अनेक नागरिकांना पाहण्यासाठी हे प्रदर्शन भरवण्यात आले होते या शिवकालीन शस्त्रसाठा प्रदर्शनाचे उद्घाटन आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या हस्ते करण्यात आले. या शिवकालीन शस्त्रांचे शहरातील व ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांनी याचा अभ्यास व लाभ करून घेतला आहे.

शिवराज्याभिषेक प्रतिष्ठान निलंगा च्या वतीने प्रभात पाटील यांच्या संकल्पनेतून शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात दिनांक १८ रोजी सायंकाळी महिलांचा छत्रपती शिवरायांच्या जीवन चरित्रावर पोवाडा हा सांस्कृतिक कार्यक्रम ठेवण्यात आला होता.

# उदगीरची ऐतिहासिक नगरी छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने दुमदुमली

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि. २१ फेब्रुवारी :** आपल्या सर्वांची छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर अपार श्रध्दा आहे. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवुन आपण सर्वजण आपल्या जीवनाची वाटचाल करत असतो. नात्याच्या पलीकडे जाऊन रयतेसाठी काम करणारे छत्रपती शिवाजी महाराज हे आपणा सर्वांचे दैवत आहेत. त्यामुळे महाराजांप्रती माझ्या मनात असणारी श्रद्धा ही शब्दात मांडता येणार नाही म्हणून मतदारसंघात छत्रपती शिवाजी महाराजांचे जवळपास २५ पुतळे सुशोभीकरण करून उभारले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्याला समता आणि न्यायाचा मार्ग दाखवून दिला असल्याचे मत माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी उदगीर शहरातील विद्यावर्धिनी हायस्कूल येथुन छत्रपती शिवाजी महाराजांच्या देखाव्याची भव्य मिरवणुक काढण्यात आली. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले व जिजाऊ बिग्रेडच्या वतीने बाळ शिवबाचा पाळणा व शालेय साहित्य, रक्तदान शिबीर आदी कार्यक्रमास आ.संजय बनसोडे यांनी उपस्थिती लावली होती.

ते उदगीर शहरात आयोजित छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते.

यावेळी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल केंद्रे, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, माजी सभापती सिद्धेश्र्वर पाटील, तहसीलदार राम बोरगावकर, नगराध्यक्षा स्वाती हुडे, उपनगराध्यक्षा शितल शिंदे, जि.प. सदस्य ज्ञानेश्र्वर बिरादार, जि.प. सदस्या उषा कांबळे, तालुका कार्याध्यक्ष वसंत पाटील, धनाजी मुळे, नगरसेवक बाळासाहेब पाटोदे, नरसिंग शिंदे, पृथ्वीराज पाटील, विजय निटुरे, शिवकुमार कांबळे, प्रा.श्याम डावळे, मधुमती कनशेट्टे, उर्मिला वाघमारे, ॲड.वर्षा कांबळे, वैशाली कांबळे, व्यंकट बोईनवाड, राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष



शशिकांत बनसोडे, पंचायत समिती सदस्य प्रकाश बिरादार, कमलाकर फुले, अनिता जगताप, सतिश पाटील माणकीकर, डी.एस. बिरादार, अंकुश ताटपल्ले, लक्ष्मी भोसले, प्रीती भोसले, गोकर्णा गायकवाड, मनकर्णा मुदाळे,

जिजाऊ ब्रिगेडच्या अनिता जाधव, पुष्पाताई जाधव, अनिता जगताप, प्रतिभा मुळे, नीता मोरे, अनिता भोसले, इंदुताई जाधव, सुरेखा भांगे, चारुशीला पाटील, शुभांगी आलट, अनिता बिरादार, महादेवी भोसले, छाया चव्हाण आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना आ.संजय बनसोडे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने उभारण्यात येणाऱ्या नाट्यगृहासाठी २२ कोटींचा निधी उपलब्ध करून दिला. नळेगाव रोडवर कोट्यावधी रुपये खर्च करुन छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने ऐतिहासिक भव्य - दिव्य महाप्रवेशद्वार उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे ते काम लवकरच पुर्ण होईल असे सांगितले. यावेळी उदगीर शहर व परिसरातील नागरीक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवजयंती उत्सव माजी सैनिक व विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत साजरी

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि. २१ फेब्रुवारी :** स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त धनेगाव येथे शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. रवींद्र कुमार पाटील व शिवजन्मोत्सव समिती धनेगाव यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात माजी सैनिक तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करून समाजापुढे प्रेरणादायी संदेश देण्यात आला. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून धनेगाव नगरीतील अनिल काशिनाथ बिरादार उपस्थित होते. त्याचबरोबर प्रमुख पाहुणे म्हणून सुभेदार संतोष राळे साहेब, कॅप्टन सचिन रंदाळे , महादेव माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य अनिल गाढे हे उपस्थित होते



कार्यक्रमाची सुरुवात शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादनाने झाली. उपस्थित मान्यवरांनी शिवरायांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या स्वराज्य, शौर्य आणि न्यायप्रियतेच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले.

यावेळी देशरक्षणासाठी कार्य केलेल्या माजी सैनिकांचा शाल, पुष्पहार व शिवप्रतिमा देऊन गौरव करण्यात आला. तसेच शिक्षण, सामाजिक कार्य, कृषी, आरोग्य आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व धनेगाव नगरीची मान उंचावणाऱ्या व्यक्तींनाही सन्मानित करण्यात आले. या सन्मान सोहळ्यामुळे कार्यक्रमाला विशेष भावनिक व प्रेरणादायी स्वरूप प्राप्त झाले.

माननीय रवींद्र कुमार पाटील यांनी आपल्या मनोगतात शिवजयंती हा केवळ उत्सव नसून स्वराज्याच्या मूल्यांची जपणूक करण्याचा संकल्प असल्याचे सांगितले. समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान केल्याने तरुणांना प्रेरणा मिळते आणि सकारात्मक कार्याची परंपरा बळकट होते, असे त्यांनी नमूद केले.

सुभेदार संतोष राळे यांनी देशसेवेसाठी सैन्यामध्ये भरती होणे गरजेचे आहे असे सांगत आपल्या जीवनातील अनुभव सर्वांसमोर मांडण्याचे कार्य केले तर कॅप्टन सचिन रंदाळे यांनी देशाच्या सैनिकांची स्थिती व त्यांचे शौर्य उपस्थित समोर मांडण्याचे कार्य केले.

या कार्यक्रमाला संपन्न करण्यासाठी शिवजन्मोत्सव समिती धनेगावने परिश्रम घेतले. सर्व मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये आभार मानून या कार्यक्रमाची समाप्ती झाली.

# लातूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.**


## डेटा ॲनालिसिस विषयावर एकदिवसीय प्रशिक्षण संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ फेब्रुवारी :** दयानंद एज्युकेशन सोसायटीच्या दयानंद कॉलेज ऑफ कॉमर्स, लातूर येथील पीजी प्रोजेक्ट रिसर्च कमिटीच्या वतीने दि. २० फेब्रुवारी २०२६ रोजी सेमिनार हॉलमध्ये डेटा ॲनालिसिस विषयावर एकदिवसीय प्रत्यक्ष (कापवी-प) प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात पार पडला. सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.पी.एम. मान्नीकर हे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर येथील सांख्यिकी विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. अतुल विराज वडागळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी डेटा ॲनालिसिसचे महत्त्व, संशोधनातील त्याची उपयुक्तता तसेच प्रत्यक्ष उदाहरणांसह विविध सांख्यिकी तंत्रांची माहिती दिली. आधुनिक संशोधनासाठी डेटा व्यवस्थापन व विश्लेषण कौशल्ये अत्यावश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. जी. आर. लहाने यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ. बी.जी. कळंबे यांनी केली. प्रमुख अतिथी भाषण डॉ. अतुल विराज वडगाळे यांनी केले.



# विविध वृत्त...

## अभाविप तर्फे मशाल यात्रेद्वारे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन



**लातूर :** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद लातूर महानगराच्या वतीने १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभाविप कार्यालय ते छत्रपती शिवाजी महाराज स्मारकापर्यंत भव्य मशाल यात्रा काढण्यात आली. देशभक्तीपर घोषणा आणि शिवगर्जना देत विद्यार्थ्यांनी उत्साहात सहभाग नोंदवला.या मशाल यात्रेत लातूर जिल्हा संयोजक यश आरिकर, सहसंयोजक भागवत बिरादार, महानगर सहमंत्री शुभम क्षीरसागर,फार्माव्हिजन प्रांत संयोजक बालाजी हत्ते यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी उपस्थितांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांच्या शौर्य, पराक्रम व राष्ट्रनिष्ठेच्या आदर्शांचे स्मरण केले. तरुणांनी शिवरायांच्या विचारांचा जागर करत समाजात राष्ट्रभक्ती आणि संघटनबळ वृद्धिंगत करण्याचा संकल्प व्यक्त केला.

## लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांचे इन्टरनॅशनल आर्ट कॉम्पिटिशनमध्ये यश



**लातूर :** मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचालित लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुल, लातूरच्या विद्यार्थ्यांनी रंगोत्सव आयोजित इन्टरनॅशनल आर्ट कॉम्पिटिशनमध्ये नेत्रदीपक यश संपादन केले आहे. रंगोत्सव सेलिब्रेशन या संस्थेमार्फत आयोजित करण्यात आलेल्या रंगरंगोटीची स्पर्धा, हस्ताक्षराची स्पर्धा, स्केचिंग स्पर्धा, कार्टून बनवण्याची स्पर्धा, कोलाज मेकिंग स्पर्धा या विविध स्पर्धेमध्ये लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुल, लातूरच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेऊन प्रमाणपत्रे, पदके आणि विविध बक्षिसे पटकावली आहेत. शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध वयोगटांत सहभागी होऊन चमकदार कामगिरी केली. या राष्ट्रीय स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर शाळेतील अनेक विद्यार्थ्यांची निवड आता आंतरराष्ट्रीय स्तरावरील कला स्पर्धेसाठी करण्यात आली आहे. या स्पर्धेत चित्रकला, रंगकाम, हस्ताक्षर आणि कोलाज मेकिंग अशा विविध प्रकारच्या स्पर्धांचा समावेश होता. या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांच्या कल्पकता, रेखाटन कौशल्य आणि रंगांच्या निवडीवर विशेष लक्ष देऊन त्यांचे मूल्यमापन करण्यात आले.

## जिल्हयातील वृध्द कलावंतांसाठी भारतीय दलित पँथरचे जिल्हा परिषदेसमोर आंदोलन

**लातूर :** गेल्या १४-१५ महिन्यांपासून सन २०२१-२४ या तीन वर्षाच्या मानधनास पात्र निवड केलेल्या कलावंतांचे आधार पडताळणी न केल्याने २५ फेब्रुवारी २०२६ रोजी भारतीय दलित पँथरचे जिल्हा परिषदेसमोर वयोवृध्द कलावंत व साहित्यकांसह कला सादरीकरण, धरणे व ठिय्या आदोंलन करण्यात येणार असल्याची माहिती संजयभाऊ कांबळे यांनी दिली. वाढत्या वयामुळे कलावंत अनेक अजारांनी ग्रस्त असल्यामुळे त्यांना वेळोवेळी वैद्यकीय उपचार व औषधोपचारासाठी पैशांची सतत आवश्यकता भासते. या कलावंतांना उपजिवीकेसाठी महाराष्ट्र शासनाचे वतीने जेष्ठ कलावंत, साहित्यीकांना आधार प्रणाली व्दारे महाडीबीटीने मानधन देण्यात येते. जेष्ठ कलावंतांचे या मानधनावर वृध्दापकाळी जीवन चरित्र अवलंबून असते. या कलावंतांची निवड समितीमध्ये अध्यक्ष जिल्हाधिकारी, सचिव जिल्हा परिषदेच्या पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी व पालकमंत्री नियुक्त जिल्ह्यातील १० जेष्ठ कलावंत साहित्यीक सदस्य असतात.

लातुर जिल्ह्यातील सन २०२१ ते २०२४ या तीन वर्षातील २८ जानेवारी २०२५ च्या बैठकीमध्ये व समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार सादरीकरणातून मंजुर करण्यात आलेल्या जिल्ह्यातील ज्येष्ठ कलावंतांची पंचायत विभागा मार्फत आधार पडताळणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे सन २०२१ ते आज पर्यंत या कलावंतांना त्यांच्या हक्काचे शासनाचे मानधन मिळत नाही व शासनाचा योजना राबविण्याचा उद्देश सफल होत नाही.

जिल्हा वृध्द कलावंत समितीचे सचिव जिल्हा परिषदेच्या पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या तीन वर्षाच्या मानधनास पात्र कलावंतांचे त्यांचे आधार पडताळणी करण्यात यावे अन्यथा दिनांक २५ फेब्रुवारी २०२६ रोजी जि.प. लातुर कार्यालयासमोर जिल्ह्यातील वयोवृध्द कलावंतांचे कला सादरीकरण धरणे व ठिय्या आंदोलन करण्यात येईल अशा आशयाचे निवेदन भारतीय दलित पँथरच्या वतीने प्रदेशाध्यक्ष ॲड. रमेशभाई खंडागळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदेश कार्याध्यक्ष संजयभाऊ कांबळे, लातुर जिल्हा सांस्कृतिक प्रमुख धम्मपाल सावंत यांनी दिला आहे.

# सिध्देश्वर मंदीर परिसर 'माऊली'च्या जयघोषणाने दुमदुमला

## संत ज्ञानेश्वर आणि तुकाराम महाराजांसह सात पवित्र पादुकांचे मंदिरात झाले पुजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ फेब्रुवारी :** लातूरचे ग्रामदैवत असलेल्या श्री सिध्देश्वर रत्नेश्वर देवस्थानात वारकरी संप्रदायाचे प्राण मानले जाणारे संत शिरोमणी ज्ञानेश्वर माऊली आणि जगद्गुरु तुकाराम महाराज, संत जनाबाई यांच्यासह सात संतांच्या पवित्र पादुकांचे आज पुजन करण्यात आले. यावेळी सिध्देश्वर मंदीर परिसरात माऊलीच्या जयघोषाने दुमदुमुन गेला होता. या पादुका पुजनप्रसंगी मदीर परिसरात हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी करण्यात आली. या सोहळ्यात मंदीरासह परिसरात असंख्य वारकरी व भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या पादुका पुजनास ह.भ.प. छोटे कदम माऊली, देवस्थानचे प्रशासक सचिन जांबूतकर, जिल्हा पोलिस अधिक्षक अमोल तांबे, उपविभागीय अधिकारी रोहिणी नजहे, मनपा उपायुक्त पंजाबराव खानसुळे,







नायब तहसीलदार सुधीर देशमुख यांच्यासह मंदीराचे विश्वस्त यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

श्री भक्त शिरोमणी नामदेव महाराज शष्टशतकोत्तर अमृत महोत्सवी संजिवनी समाधी सांगता, श्री संत ज्ञानेश्वर महाराज सप्तशतकोत्तर जन्मोत्सव सांगता सोहळा आणि जगद्गुरु तुकाराम महाराज त्रिशकतोत्तर अमृत महोत्सवी वैकुंठगमन सांगता सोहळ्यानिमित्त लातूरात वारकजयांचा मेळा भरला आहे.

या निमित्ताने संत ज्ञानेश्र्वर व संत तुकाराम महाराज, संत नामदेव महाराज व संत जनाबाई यांच्या पादुकांचे आगमन शनिवार दि. २१ फेब्रुवारी रोजी हेलिकॉप्टरने झाले. सर्वप्रथम या पादुका लातूरचे ग्रामदैवत असलेल्या श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर मंदिरात दुपारी ११ वाजण्याच्या सुमारास आल्या. यानिमित्ताने या पादुकांचे पुजन देवस्थानच्या वतीने करून महाआरती करण्यात आली. यावेळी पादुकांचे पुजन होत असताना मंदीर परिसरात हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी करण्यात आली. सदर सोहळ्यासाठी लातूर शहरासह जिल्हाभरात वारकरी संप्रदायातील वारकरी भक्त व शिवभक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सदर पादुकांचे स्वागत करण्यासाठी मंदीर परिसर आकर्षक फुलांनी सजविण्यात आला होता. पादुकांचे आगमन मंदीरात होताच पादुकांवर पुष्पवृष्टी करण्यासाठी अनेक महिला पारंपारिक वेशभूषेत उपस्थित होत्या. तसेच छत्रपती शिवाजी महाराज व मावळ्यांची वेशभूषा केलेले लहान मुलेही यात सहभागी झाली होती.पादुकांचे पुजन झाल्यानंतर श्री सिध्देश्वराची महाआरती करण्यात आली.

या सोहळ्यासाठी उपस्थित असलेले उपविभागीय अधिकारी रोहिणी नजहे, पोलिस अधिक्षक अमोल तांबे यांचा देवस्थान समितीच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला. हा सोहळा यशस्वी पार पाडण्यासाठी सिध्देश्वर मंदीराचे विश्वस्त अशोक भोसले, रमेशसिंह बिसेन,व्यंकटेश हालिंगे, विशाल झांबरे, ओम गोपे आदींसह देवस्थानचे स्वयंसेवक यांनी परिश्रम घेतले. या सोहळ्यात सहभागी झालेल्या वारकऱ्यांसह भाविकांसाठी देवस्थानच्या वतीने अल्पोपहाराची सोय करण्यात आली होती. या सोहळ्यादरम्यान पोलिस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता.

## परीक्षा केंद्रांवर अपर पोलीस अधीक्षकांच्या भेटी; दहावीच्या परीक्षेसाठी कडक पोलीस बंदोबस्त

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ फेब्रुवारी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ आयोजित इयत्ता दहावी (SSC) मुख्य लेखी परीक्षा दिनांक २० फेब्रुवारी २०२६ ते १८ मार्च २०२६ या कालावधीत जिल्हाभरात पार पडत आहे. सदर परीक्षा पूर्णतः शांत, सुरक्षित, कॉपीमुक्त व निर्विघ्न वातावरणात पार पाडण्यासाठी लातूर जिल्हा पोलीस दलाने व्यापक नियोजन करून मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या स्पष्ट निर्देशांनुसार प्रत्येक पोलीस ठाण्याच्या हद्दीतील परीक्षा केंद्रांवर आवश्यक तेवढा पोलीस बंदोबस्त देण्यात आला असून संबंधित ठाणे प्रभारी अधिकारी व पोलीस निरीक्षक स्वतः परीक्षा केंद्रांना भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेत आहेत.

अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांनी देखील विविध परीक्षा केंद्रांना प्रत्यक्ष भेटी देऊन बंदोबस्ताची पाहणी केली. संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना परीक्षा सुरळीत पार पडण्यासाठी आवश्यक सूचना देण्यात आल्या असून कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी दक्षता घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## लातूरच्या ट्युशन एरिया परिसरात पोलिसांचे कोंबिंग ऑपरेशन

### मोटार वाहन कायद्याच्या ८६ केसेस, ५८,५०० रुपये दंड व ७ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ फेब्रुवारी :** लातूर शहर हे राज्यभरात शैक्षणिक पॅटर्नसाठी प्रसिद्ध असून दरवर्षी हजारो विद्यार्थी शिक्षणासाठी येथे दाखल होतात. ट्युशन एरिया परिसरात सायंकाळी विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असल्याने त्यांच्या सुरक्षिततेस बाधा येऊ नये व कोणतीही असामाजिक प्रवृत्ती डोके वर काढू नये, यासाठी लातूर पोलिसांकडून सातत्याने विशेष मोहिमा राबविल्या जातात.

दिनांक २०/१२/२०२६ रोजी सायंकाळी सुमारे ७.०० वा. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या आदेशानुसार व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली ट्युशन एरिया परिसरात अचानक कोंबिंग ऑपरेशन राबविण्यात आले. या मोहिमेत स्वतः पोलीस अधीक्षक व अपर पोलीस अधीक्षक यांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदवून रस्त्यावर उतरून कारवाईवर देखरेख ठेवली. उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांच्या समन्वयाने ही कारवाई पार पडली. सदर मोहिमेत शिवाजीनगर पोलीस ठाणे, गांधी चौक पोलीस ठाणे, विवेकानंद चौक पोलीस ठाणे, दामिनी पथक व दंगा नियंत्रण पथकातील एकूण ९ पोलीस अधिकारी, ६० पोलीस अंमलदार व होमगार्ड सहभागी झाले होते. ट्युशन एरियातील मुख्य रस्ते, गल्ली-बोळ, चौक व विद्यार्थ्यांची वर्दळ असलेली ठिकाणे यांचे संयुक्त निरीक्षण करण्यात आले. विनाकारण जमाव, संशयास्पद हालचाली, विद्यार्थ्यांना त्रास देणारे व्यक्ती यांच्यावर विशेष लक्ष ठेवण्यात आले. संशयितांची नोंद, ओळख पडताळणी व आवश्यक कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. या मोहिमेदरम्यान - मोटार वाहन कायद्यान्वये ८६ केसेस दाखल करून एकूण ५८,५००/- दंड वसूल करण्यात आला असून २ फटाका सायलेन्सर जप्त करण्यात आले आहे तसेच विनाकारण फिरणे, विद्यार्थ्यांना त्रास देणे, गुंडगिरीची प्रवृत्ती व गैरवर्तन आढळलेल्या ७ जणांवर महाराष्ट्र पोलीस अधिनियम अंतर्गत प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली.

ही कारवाई ट्युशन एरियामध्ये सतत बेताल वर्तन करणाऱ्या व विद्यार्थ्यांमध्ये दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या असामाजिक तत्त्वांवर वचक बसविण्यासाठी करण्यात आली आहे. लातूरमध्ये शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना भयमुक्त, सुरक्षित आणि शिस्तबद्ध शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देणे हा या मोहिमेचा मुख्य हेतू आहे. पोलिसांकडून पुढील काळातही अशाच प्रकारच्या अचानक व व्यापक मोहिमा राबवून असामाजिक हालचालींवर आळा,गुन्हेगारी प्रवृत्तीचे निर्मूलन,विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षिततेचा विश्वास निर्माण या दिशेने सातत्यपूर्ण प्रयत्न केले जाणार आहेत.

## एम. एस. बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात गणित विषयाची विभागीय स्पर्धा संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ फेब्रुवारी :** मराठवाडा मॅथेमॅटिकल सोसायटी, छत्रपती संभाजीनगर आणि एम. एस. बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमानाने '२२ व्या रिजनल लेव्हल सेमिनार ऑन मॅथेमॅटिक्स अँन्ड इट्स एप्लिकेशन्स' या स्पर्धेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. लातूर, नांदेड आणि धाराशिव या तीन जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठीची स्पर्धा यावर्षी बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे उद्घाटन प्रा. डॉ. एम. एस. वावरे राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर यांच्या हस्ते झाले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. एस एस कुलकर्णी आणि प्रा. डॉ. एस. एस. फुलसागर यांनी जवाबदारी पार पाडली. मराठवाडा मॅथेमॅटिकल सोसायटी, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून स्पर्धेसाठी यामध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय आणि उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आले.

या स्पर्धेत राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथील मुरकुटे ए. डी. या विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक पटकावला. तर द्वितीय क्रमांक एम. जी. महाविद्यालय, अहमदपूर येथील विद्यार्थिनी थाटे वैष्णवी, तृतीय क्रमांक महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर येथील आशिष शिंदे आणि उत्तेजनार्थ पारितोषिक महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर येथील ओम उगले व दयानंद सायन्स महाविद्यालय, लातूर येथील हुंबे एस. बी. या विद्यार्थ्यांनी पटकावले.

पारितोषिक वितरण व समारोपाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. जे. ए. ननावरे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. डॉ. एस. एस. फुलसागर, प्रा. डॉ. एम. व्ही. बुके तसेच प्रा. डी. आर. बिरादार यांनी स्पर्धेतील विद्यार्थ्यांच्या सहभागाबद्दल मत मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्पर्धेचे आयोजक गणित विभाग प्रमुख प्रा. डॉ. एन. जी. पाटील यांनी केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. एस. एम. जगदे आणि प्रा. डॉ. जे. ए. ननावरे यांनी स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्रा. एम. व्ही. नष्टे यांनी केले, तर प्रा. जी. सी. शाबादे यांनी आभार मानले. यावेळी परिसर संचालक प्रा. डॉ. एम. व्ही. बुके, उपप्राचार्य प्रा. व्ही. एस. बाळे, निबंधक प्रा. डॉ. जे. एस. हत्ते , प्रा. डी. आर. बिरादार, प्रा. ए. आर. माका, प्रा. डी. के. कोकरे, प्रा. एस. डी. शिंदे, प्रा. एस. आर. बिराजदार प्रा. टी. एस. सोनावणे , प्रा. पी. पी. कोरे यांची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

या स्पर्धेत निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील चिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजय रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे, संचालक राजेश्वर बुके, बसवराज येरटे, काशिनाथ साखरे, ललिता पांढरे, महेश हलगे, बाबूराव तरगुडे, प्रा. गुरुलिंग धाराशिवे यांनी अभिनंदन केले आहे.

# गुन्हेगारांची गय नको; अवैध मद्यविक्री, अंमली पदार्थ विक्री रोखा - पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

## पालकमंत्र्यांनी घेतला जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेचा आढावा !

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ फेब्रुवारी :** जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी पोलिसांनी कठोर पावले उचलावीत. सराईत गुन्हेगार, तसेच कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या प्रत्येक व्यक्तींवर कठोर कार्यवाही करावी. शहरातील ट्युशन एरियासह शाळा, महाविद्यालय परिसरात विनाकारण फिरणाऱ्या, दहशत माजविणाऱ्यांविरुद्ध आवश्यक कार्यवाही हाती घेण्याच्या सूचना पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज दिल्या.

लातूर जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी पालकमंत्री श्री. भोसले यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्य प्रणालीद्वारे आढावा बैठक घेण्यात आली. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार अभिमन्यू पवार, आमदार रमेश कराड, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांच्यासह जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

पोलिसांनी शहरातील विविध भागात अचानक कॉम्बिंग ऑपरेशन राबवून अवैध शस्त्रे बाळगणाऱ्या व्यक्तींवर, सराईत गुन्हेगारांवर कारवाई करावी. विशेषतः शहरातील वसतिगृहे, ट्युशन एरियासह इतर भागात सातत्याने पोलिस गस्त सुरू करावी. जिल्ह्यातील अवैध दारू विक्रीला पायबंद करण्यासाठी पोलीस प्रशासन आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाने संयुक्त मोहीम हाती घ्यावी. अंमली पदार्थ, नशा करण्यासाठी वापरली जाणारी औषधे याची जिल्ह्यात विक्री होणार नाही, यासाठी अन्न व औषध प्रशासनाने तातडीने मोहीम हाती घ्यावी. ज्या परिसरात अवैध दारू, अंमली पदार्थ विक्री होत असल्याचे निदर्शनास येईल, त्या क्षेत्राच्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे पालकमंत्री श्री. भोसले यांनी सांगितले. गंभीर प्रकारचे गुन्हे दाखल असलेल्या गुन्हेगारांवर तडीपारीची कार्यवाही करावी. कोणत्याही गुन्हेगाराची गय न करता जिल्ह्याच्या कायदा व सुव्यवस्थेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे,



असे पालकमंत्री श्री. भोसले म्हणाले. बेकायदेशीरपणे शस्त्रास्त्रे बाळगणाऱ्या, अशी शस्त्रास्त्रे विक्री करणाऱ्या व्यक्तींचा शोध घेवून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याच्या सूचनाही पालकमंत्र्यांनी दिल्या. तसेच युवक, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना चुकीच्या मार्गापासून परावृत्त करण्यासाठी जनजागृती करावी, असेही त्यांनी सांगितले.

सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार अभिमन्यू पवार, आमदार रमेश कराड यांनीही यावेळी कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने आवश्यक सूचना दिल्या.

जिल्ह्यात एमपीडीए अंतर्गत कार्यवाही जलद गतीने करण्यात येत आहे. तसेच शाळा, महाविद्यालयातील प्राचार्य, हॉस्टेल चालक यांच्या मदतीने शहरात लवकरच विद्यार्थ्यांच्या समुपदेशनासाठी मोहीम राबविण्यात येईल, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले.

जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली.

## अग्रलेख...

# खिरापतींना ‘सर्वोच्च’ चपराक

लोकशाही शासन व्यवस्था म्हणजे लोकांनी लोकांसाठी चालविलेली व्यवस्था असते. ती समाजाच्या तळागाळातील, गोरगरीब वर्गाच्या कल्याणासाठी असते. शासनाने समाजातील वंचित, पीडित, दलित, शोषित आणि उपेक्षित वर्गाच्या सर्वांगीण उत्थानासाठी आवश्यक निर्णय घेतले पाहिजेत, उपाययोजना केली पाहिजे, याबद्दल कोणाचे दुमत असण्याचे कारण नाही. कल्याणकारी शासन व्यवस्थेची ती नैतिक आणि मूलभूत जबाबदारी म्हटली पाहिजे. एकात्म मानववादाचे प्रणेते पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या अन्त्योदयाची संकल्पनाही हीच आहे. अन्त्योदय म्हणजे समाजातील शेवटच्या माणसाचे कल्याण. समाजातील शेवटचा माणूस म्हणजे जो अन्न, वस्त्र आणि निवारा या जीवनातील मूलभूत गरजांपासून वंचित आहे तो माणूस. मात्र, गेल्या काही वर्षांत कल्याणकारी योजना आणि खिरापत किंवा रेवडी संस्कृती यांची सरमिसळ केली जात आहे, असे नाईलाजाने म्हणावेसे वाटते. खरे म्हणजे रेवडी संस्कृती आणि कल्याणकारी योजना यांत खूप फरक आहे. मात्र, खिरापत संस्कृतीत समाजातील गोरगरीब वर्गाच्या असहायतेचा एकप्रकारे गैरफायदा घेतला जातो. कल्याणकारी योजनेत त्याला स्वाभिमानाने जगण्याची संधी दिली जाते. त्याला स्वबळावर उभे होण्याची संधी दिली जाते.

सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भात दिलेला निर्णय सगळ्यांच्याच डोळ्यात अंजन आहे. मोफत योजनांसोबत आणखी एक प्रकार सध्या जोरात आहे. तो म्हणजे थेट बँक खात्यात कोणत्याही सबसिडीचे पैसे जमा करणे. या प्रकारात भ्रष्टाचार कमी होत असला, तरी या योजनेचा मोठ्या प्रमाणात गैरफायदाही घेतला जातो. सर्वोच्च न्यायालयाचा ताजा निर्णय तामिळनाडूसंदर्भात असला, तरी देशातील सर्व राज्य सरकारांना तो लागू होणारा आहे. द्रमुक सरकारने निवडणुकीवर डोळा ठेवून राज्यातील जनतेला मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला; त्याला तेथील वीज मंडळाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. राज्यात सध्या दरमहा १०० युनिट वीज मोफत आहे. नवी योजना लागू झाली तर संपूर्ण वीज मोफत मिळेल. याचा फायदा जसा गरीब वर्गाला मिळेल, तसाच तो श्रीमंतांनाही मिळेल. हरकतीचा मुद्दा हाच आहे. ज्याला गरज आहे, त्याला देण्यात काही हरकत नाही. पण ज्याला गरज नाही, त्याला कोणत्याही मोफत योजनेचा लाभ देणे चुकीचेच. सारे काही मोफत देण्याच्या योजनांमुळे देशाच्या आर्थिक विकासात अडथळा निर्माण होत आहे, या शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने सरकारला फटकारत अशा योजनांचा फेरविचार करण्याची सूचना केली आहे. सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय देशाच्या व्यापक हिताचा म्हटला पाहिजे. तामिळनाडूत येत्या काही महिन्यात विधानसभेच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. त्या पृष्ठभूमीवर वीज वितरण कंपनीच्या याचिकेची दखल घेताना सरन्यायाधीश सूर्यकांत, न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. विपुल पंचोली यांच्या खंडपीठाचे हे निर्देश तामिळनाडू सरकारला दिले आहेत. त्यावर तामिळनाडू सरकार कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष आहे. निवडणुका असलेल्या राज्यात त्या जिंकण्यासाठी मतांवर डोळा ठेवत लोकांना आकर्षित करणारे लोकप्रिय निर्णय घेण्याची प्रथा पडली आहे, असे म्हटले तर ते चूक ठरू नये.

मोफत योजना म्हणजे एकप्रकारे मतदारांना दिलेली लाच! दुसऱ्या शब्दात सांगायचे तर पैसे देऊन मत विकत घेण्याचा लोकशाहीविरोधी प्रकार म्हटला पाहिजे. त्यातूनच अमकी बहीण, तमका भाऊ, आवडता काका- मामा- भाचा- पुतण्या अशा लाडक्यांच्या मालिकांच्या योजनांची रांग लागली. सहज मार्गाने मते मिळविण्यासाठी राजकीय पक्षांना किंवा सरकारांना अशा योजनांचा अवलंब करावा लागतो. रेवडी योजनांचा राज्याच्या तसेच देशाच्याही अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होतो. त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे यातून आपण समाजाला ऐतखाऊ बनवितो, याचे भान ठेवण्याची गरज न्यायालयाने प्रतिपादिली आहे. सगळ्यांना सगळेच मोफत मिळाल्यास लोक काम तरी का करतील; यातून आम्ही कोणती संस्कृती विकसित करीत आहोत, असा जो प्रश्न न्यायालयाने विचारला, तो अतिशय मार्मिक म्हणावा लागेल. मोफत धान्य, मोफत वीज आणि अन्य मोफत योजनांची देशात लाट आली आहे. याचा अर्थ सरकारने समाजातील तळागाळातील लोकांच्या कल्याणासाठी काही करू नये, असा नव्हे. सरकार, मग ते कोणत्याही राजकीय पक्षाचे असो, त्याने समाजातील तळागाळातील लोकांच्या व्यापक कल्याणासाठी तात्पुरत्या स्वरूपाच्या उपाययोजना करण्याऐवजी स्थायी स्वरूपाच्या उपाययोजना करण्याची गरज आहे. मोफत योजनांचा भडीमार करण्याऐवजी त्यांना स्वावलंबी आणि आत्मनिर्भर केले पाहिजे. आपल्या पायावर उभे राहता यावे यासाठी त्यांना शिक्षणाची संधी तसेच व्यावसायिक प्रशिक्षण उपलब्ध करून दिले पाहिजे. सर्वांना रोजगार मिळेल, याची काळजी घेतली पाहिजे. रोजगार उपलब्ध करून दिले तर लाचारीचे जीणे जगण्याची आणि मोफत योजनांची भीक घेण्याची वेळ कोणावर येणार नाही. सर्वांना ताठ मानेने आणि स्वाभिमानाने जगता येईल.

योजनेच्या नावात ‘मोफत’ हा शब्द असला, तरी त्यासाठी सरकारला खर्च करावा लागतोच. ही राशी थोडीथोडकी नाही; ती काही हजार कोटींच्या घरात असते. सरकारला मिळणारा महसूल हा निश्चित आहे; त्यात एका मर्यादेपेक्षा जास्त वाढ होऊ शकत नाही. त्यामुळे विकास कामांवरच्या खर्चाला कात्री लावली जाते. त्यामुळे त्याचा फटकाही समाजालाच बसत असतो. आवश्यक योजनांवरील खर्च कमी करीत सरकारला अनावश्यक योजनांसाठी आर्थिक तरतूद करावी लागते. सर्व काही मोफत मिळू लागल्यामुळे कष्ट करण्याची सवय हळूहळू लोप पावत आहे. श्रमाला जी प्रतिष्ठा होती, ती कमी होत चालली आहे. ग्रामीण भागात शेतात काम करायला आज शेतमजूर मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची कोंडी होत आहे. शहरी भागात घरांत काम करणाऱ्या बायकांची संख्याही कमी होत चालली आहे. यातून नवीन सामाजिक प्रश्न उद्‌भवत आहेत. मुळात काम करण्याची सवयच समाजातून कमी होत चालली आहे, हा चिंतेचा विषय म्हटला पाहिजे. आज रोजगार मिळत नाही, बेरोजगारी वाढली असल्याचे रडगाणे सगळेच गात असतात; पण काम करण्याची, त्यातही कष्टाचे काम करण्याची कोणाची तयारी नाही, ही विसंगती म्हटली पाहिजे. सर्वांना दहा ते पाचची सुखाची नोकरी हवी आहे. मोफतच्या योजनांचा मारा करीत आम्ही समाजाला ऐदी, आळशी आणि ऐतखाऊ तर बनवले नाही ना, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे एकप्रकारे सर्वोच्च न्यायालयाने सगळ्याच सरकारांचे कान नुसते पकडले नाही तर पिळलेही.

राजकीय पक्ष आपल्या तात्कालिक लाभासाठी काही निर्णय घेत असतात. मोफत योजना हा असाच एक निर्णय आहे. यातून समाजाचे, देशाचे आणि देशाच्या अर्थव्यवस्थेचे किती नुकसान होते, याचा विचार ते करत नाहीत वा करू शकत नाहीत. एकीकडे आम्ही देशाला आत्मनिर्भर करण्याच्या गोष्टी करतो आणि दुसरीकडे देशातील जनतेवर मोफत योजनांचा मारा करीत त्यांना ऐदी किंवा आळशी बनवू पाहतो. याचा फटका देशातील विकास कामांना बसतो. सरकारला समाजातील तळागाळातील व्यक्तींसाठी काही करायचे असेल तर त्यांच्या मुलांना केजीपासून पीजीपर्यंतचे शिक्षण मोफत दिले पाहिजे. त्यांच्या मोफत वैद्यकीय उपचाराची व्यवस्था केली पाहिजे. अशा फुकटखाऊ योजना राबविण्यासाठी सरकारने एकतर आपल्या महसुलात वाढ केली पाहिजे, ते शक्य नसेल तर अशा योजना त्याचा आढावा घेत बंद केल्या पाहिजे. कारण अशा योजनांवर खर्च होणारा पैसा हा करदात्यांचा कष्टाचा आणि घामाचा असतो. त्याची उधळपट्टी करण्याचा अधिकार कोणत्याही सरकारला नाही. मतांसाठी सार्वजनिक पैशांचा असा खिरापतीसारखा केल्याने ज्याच्या खिशातून हा पैसा जातो, त्याचे नुकसान होते. ज्याला पात्रता नसताना तो पैसा मिळतो, त्याचेही नुकसान होते. अंतिमतः देशाचेही नुकसान होतेच.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# या चिमण्यांनो, परत फिरा रे!

गोव्याची गोव्याची भूमी ही केवळ निसर्गसौंदर्यासाठीच नाही, तर पराक्रमाच्या आणि संघर्षाच्या इतिहासासाठीही ओळखली जाते. याच पृष्ठभूमीवर महाशिवरात्रीच्या शुभमुहूर्तावर गोव्यातील पणजी येथील ३० वाडी परिसरात देव गोवेश्वर महाशिव मंदिरात भव्य धार्मिक सोहळा पार पडला; ज्याने केवळ गोव्याचेच नव्हे, तर संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले. या सोहळ्यात सुमारे ५०० बांधवांनी हिंदू धर्मात पुनर्प्रवेश केला आहे. यावेळी जगद्‌गुरू रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी महाराज यांचे मार्गदर्शन लाभले आहे. आखाडा परिषदेतील प्रमुख साधुसंत-महंतांच्या साक्षीने वेदपठन, हवन आणि पारंपरिक हिंदू विधी पार पडले. सुमारे ३०० बांधवांनी औपचारिकरीत्या ‘घरवापसी’ केली, तर इतर २०० जणांनीही हिंदू धर्म स्वीकारत एकूण संख्या ५०० वर पोहोचली. हा केवळ एक धार्मिक विधी नव्हता, तर तो होता आपल्या विखुरलेल्या बांधवांना पुन्हा एकदा मायेच्या सावलीत घेण्याचा एक भावनिक आणि आध्यात्मिक प्रयत्न.

हिंदू धर्माचा इतिहास हा सहिष्णुतेचा इतिहास आहे. मात्र, याच सहिष्णुतेचा फायदा घेत अनेक आक्रमकांनी आणि परकीय शक्तींनी या धर्मावर आघात केले. पण आपण सहिष्णू असलो, तरी पराक्रमात कधीही मागे नव्हतो. आपण या परकीय आक्रमकांचा सामना केला. गोव्याचा इतिहास तर अशा अनेक जखमांनी भरलेला आहे. पोर्तुगीज राजवटीत झालेल्या छळाच्या कथा ऐकल्या तर आजही अंगावर काटा येतो. आजही अनेक ठिकाणी कपटाने, प्रलोभने दाखवून किंवा गरिबी आणि अज्ञानाचा फायदा घेऊन हिंदू बांधवांचे धर्मांतर केले जाते. मिशनऱ्यांच्या जाळ्यात अडकून, आपल्या पूर्वजांच्या संस्कृतीपासून दूर गेलेली ही माणसे प्रत्यक्षात आपल्या मुळांपासून तुटलेली असतात. नरेंद्र महाराजांनी या वास्तवावर नेमके बोट ठेवले आहे. जे बांधव बळजबरीने, कपटाने, लालूच देऊन किंवा काही कारणास्तव त्रस्त होऊन आपला धर्म सोडून गेले, त्यांना पुन्हा सन्मानाने आपल्या धर्मात स्थान देणे, हे आपले कर्तव्य आहे. घरवापसी म्हणजे केवळ धर्मांतर नव्हे, तर ती आहे आपल्या रक्ताच्या नात्याची पुनर्भेट. ज्याप्रमाणे एखादे पाखरू संध्याकाळी आपल्या घरट्याकडे परतते, तशीच ही माणसे आज आपल्या मूळ संस्कृतीकडे परतत आहेत.

हिंदू धर्म हा केवळ एक उपासना पद्धती नसून ती एक व्यापक जीवन पद्धती आहे. हा धर्म म्हणजे फळे आणि फुलांनी बहरलेला एक विशाल वृक्ष आहे. या वृक्षाची मुळे हजारो वर्षे खोलवर रुजलेली आहेत. या वृक्षाच्या शीतल सावलीत बसण्याचा अधिकार जगातील प्रत्येक मानवाला आहे. या वृक्षाची फळे चाखण्याचा आणि त्याच्या फुलांचा सुवास घेण्याचा अधिकार कोणा एका विशिष्ट वर्गाचा किंवा जातीचा नाही, तर तो संपूर्ण मानवजातीचा आहे. अनेक आक्रमक आले, त्यांनी या वृक्षाच्या फांद्या तोडण्याचा प्रयत्न केला, त्याच्या मुळावर घाव घातले, पण हा वृक्ष आजही ताठ मानेने उभा आहे. जगातील अनेक प्राचीन संस्कृती काळाच्या ओघात नष्ट झाल्या. मेसोपोटेमिया, इजिप्त, ग्रीस यांसारख्या महान संस्कृती आज केवळ इतिहासाच्या पुस्तकात उरल्या आहेत. मात्र, हिंदू धर्म आणि त्याची संस्कृती आजही जिवंत आहे, प्रवाही आहे. हेच आमचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे. हा धर्म ‘सनातन’ आहे. कारण तो शाश्वत सत्यावर आधारित आहे. त्याचबरोबर इथे सुधारणाही सहज होत आहेत. आजच्या आधुनिक जगात केवळ अध्यात्म सांगून चालणार नाही, तर आपल्याला वास्तवाचे भानही ठेवावे लागणार आहे. इथे एक अत्यंत महत्त्वाचा मुद्दा उपस्थित राहतो, तो म्हणजे ‘संख्याशास्त्र.’ लोकशाहीच्या युगात संख्याबळाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. जर हिंदूंची संख्या घटत गेली, तर आपली संस्कृती, आपली मंदिरे आणि आपली जीवन पद्धती धोक्यात येऊ शकते. त्यामुळेच धर्मांतर रोखणे आणि गेलेल्यांना परत आणणे ही आजच्या काळाची गरज बनली आहे. आपण आपली पाळेमुळे जपली असली, तरी आपल्याला यापुढे अत्यंत सावध राहावे लागणार आहे. शत्रू केवळ तलवारी घेऊन धावत येत नाही, तर तो कधी विचारांच्या रूपात, कधी मदतीच्या रूपात तर कधी प्रलोभनांच्या रूपात आपल्या घरात शिरतो. आपल्या बांधवांना आपल्या धर्माचे महत्त्व पटवून देणे, त्यांच्या अडचणीत त्यांच्या पाठीशी उभे राहणे, हे प्रत्येक हिंदूचे कर्तव्य आहे. जर आपण आपल्या बांधवांची काळजी घेतली, तर त्यांना बाहेर मदतीसाठी हात पसरण्याची गरज पडणार नाही.

जगात आज सर्वत्र अशांतता पसरलेली आहे. युद्धे, दहशतवाद आणि द्वेषाच्या वातावरणात जग होरपळून निघत आहे. अशा वेळी जगाला शांततेचा मार्ग केवळ हिंदू धर्मच दाखवू शकतो. याचे कारण म्हणजे हिंदू धर्माची मूळ वृत्ती. ‘वसुधैव कुटुंबकम्’ म्हणजे संपूर्ण जग हेच एक कुटुंब आहे, ही भावना केवळ हिंदू धर्मातच आढळते. आपण केवळ स्वतःच्या कल्याणाचा विचार करत नाही, तर आपण ‘पसायदान’ मागतो. संत ज्ञानेश्वरांनी पसायदानात म्हटले आहे, ‘जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो । भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ॥’ म्हणजे दुष्टांची बुद्धी पालटो आणि सर्व प्राणिमात्रांमध्ये मैत्रीची भावना निर्माण होवो. ही उदात्त भावना, ही विश्वकल्याणाची प्रार्थना केवळ एका हिंदूच्याच अंतःकरणातून येऊ शकते. त्यामुळेच जगात शांतता प्रस्थापित करायची असेल, तर हिंदू धर्माचे विचार प्रबळ होणे आवश्यक आहे. जे बांधव काही कारणास्तव अहिंदू झाले आहेत, ज्यांचे पूर्वज हिंदू होते, पण आज ते आपल्या संस्कृतीपासून दुरावले आहेत, त्यांना आमचे कळकळीचे आवाहन आहे- आपल्या घरी परत या. हिंदू धर्म हा कोणावरही सक्ती करत नाही, तो कोणाचा द्वेष करत नाही. हा धर्म तुम्हाला स्वीकारण्यासाठी, तुम्हाला प्रेम देण्यासाठी सदैव सज्ज आहे. नरेंद्र महाराजांनी आतापर्यंत अनेकांना पुन्हा हिंदू धर्मात आणले आहे. हा आकडा केवळ संख्या दर्शवत नाही, तर तो दर्शवतो त्या लोकांचा आपल्या मूळ संस्कृतीवर असलेला विश्वास. गोव्यातील त्या ५०० लोकांच्या डोळ्यांतील समाधान हे सांगत होते की, त्यांना त्यांचे हरवलेले घर सापडले आहे. वैदिक मंत्रांच्या घोषात, अग्नीच्या साक्षीने जेव्हा त्यांनी पुन्हा हिंदू धर्माची दीक्षा घेतली, तेव्हा तो क्षण केवळ त्यांच्यासाठीच नाही, तर संपूर्ण हिंदू समाजासाठी अभिमानाचा होता.

धर्मांतराचे संकट हे केवळ धार्मिक संकट नाही, तर ते सामाजिक आणि राष्ट्रीय संकटही आहे. जेव्हा एखादा हिंदू बांधव आपला धर्म सोडतो, तो आपल्या हजारो वर्षांच्या संस्कृतीपासून, आपल्या पूर्वजांच्या परंपरांपासून आणि आपल्या राष्ट्राच्या अस्मितेपासून दुरावतो. आपल्याला हे समजून घ्यावे लागेल की, धर्मांतर हे बहुधा अज्ञानातून किंवा गरजेपोटी केले जाते. जर आपण आपल्या बांधवांना योग्य शिक्षण दिले, त्यांना आपल्या धर्माचे श्रेष्ठत्व पटवून दिले तर कोणीही त्यांना आपल्यापासून तोडू शकणार नाही. या सोहळ्याने हे सिद्ध केले आहे की, जर आपण प्रेमाने आणि सन्मानाने साद घातली, तर गेलेले बांधव नक्कीच परत येतात. हिंदू धर्म हा कधीही संकुचित नव्हता. ‘आ नो भद्राः क्रतवो यन्तु विश्वतः’ म्हणजे सर्व दिशांनी आम्हाला शुभ विचार प्राप्त होवोत, ही आमची प्रार्थना आहे. आपण जगाला ‘योग’ दिला, ‘आयुर्वेद’ दिला आणि ‘अध्यात्म’ दिले. जगाला शांतीचा संदेश देणारा हा धर्म आज स्वतःच्या अस्तित्वासाठी संघर्ष करीत आहे. गोव्यातील त्या ५०० लोकांनी जेव्हा पुन्हा एकदा कपाळावर टिळा लावला आणि ‘हर हर महादेव’चा जयघोष केला, तेव्हा तो केवळ एक आवाज नव्हता, तर तो होता आपल्या स्वाभिमानाचा हुंकार. हा हुंकार साऱ्या जगाला सांगत आहे की, हिंदू धर्म हा कधीही संपणारा नाही. तो त्या अक्षय वटासारखा आहे, जो प्रत्येक संकटातून अधिक जोमाने उभा राहतो. घरवापसीचा हा सोहळा एका नवीन पहाटेची सुरुवात आहे. जर आपण संघटित झालो आणि आपल्या बांधवांना प्रेमाने जवळ केले, तर कोणतीही शक्ती आपल्याला आपल्या मुळांपासून तोडू शकणार नाही. हिंदू धर्म हा त्या विशाल महासागरासारखा आहे, ज्यात अनेक नद्या येऊन मिळतात. या महासागराची खोली आणि त्याचे गांभीर्य समजून घेण्याची आज गरज आहे. या हिंदू धर्मावर तुमचाही अधिकार आहे बंधू आणि भगिनींनो... हा रुसवा सोडा आणि या विशाल वृक्षाच्या आश्रयाला या... या चिमण्यांनो, परत फिरा रे...

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**नीलेश जोशी**

# विद्यार्थ्यांमधील वाढते व्यसन चिंताजनक

एकीकडे जगात सर्वाधिक तरुणाई आपल्या देशात असल्याचा अभिमान बाळगत असतानाच दुसरीकडे उद्याचे भविष्य म्हणविल्या जाणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाढती व्यसनाधीनतेची समस्या चिंताजनक आहे. यासंदर्भात प्रचार माध्यमातून समोर येणारे काही वृत्त हे मतिगुंग करणारे आहेत. छत्तीसगढ राज्यातील धमतरी जिल्ह्यातील एका सरकारी शाळेत तब्बल ३५ मुलांनी मनगटावर ब्लेड मारून स्वतःला जखमी करून घेतले. या घटनेने तेथे एकच खळबळ उडाली. शासकीय यंत्रणा या संदर्भात तपास करीत आहे. याबाबत येथील गटशिक्षणाधिकाऱ्यांनी मुलांनी हा प्रकार ड्रग्ज सेवनाच्या प्रभावाखाली येऊन केला असावा, असा संशय व्यक्त केला आणि पुन्हा शालेय विद्यार्थ्यांमधील व्यसनाधीतनेची चर्चा सुरू झाली. ही घटना छत्तीसगढ राज्यातील असली, तरी देशात सर्वदूर ही समस्या आहे. गत ऑगस्ट महिन्यात पुण्यातील हडपसर परिसरात असलेल्या शाळेत असाच प‘कार उघडकीस आला होता. चौथी ते सातव्या इयत्तेत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये चॉकलेटच्या माध्यमातून अमली पदार्थ पोहोचविल्या जात असल्याचे तेव्हा उघडकीस आले होते. या गंभीर समस्येची व्याप्ती निश्चितच मोठी आहे. त्याच्या मुळाशी जाऊन व्यसनाधीनतेचे निर्मूलन करणे अत्यावश्यक आहे. कारण देशाचे भविष्य असणारी पुढची पिढीच संकटात आहे.



ही समस्या केवळ शहरापुरती मर्यादित नाही; ग‘ामीण भागातही ती झपाट्याने वाढताना दिसते. शाळेच्या गणवेशात असलेली मुले जर शाळेच्या बाहेर सिगारेट ओढताना किंवा गुटखा खाताना दिसली, तर तो समाजासाठी निश्चितच धोक्याचा इशारा म्हणावा लागेल.

शाळकरी विद्यार्थ्यांमधील व्यसनांच्या विळ‘याची आकडेवारी धक्कादायक आहे. गत काळात एका सामाजिक संघटनेने केलेल्या सर्वेक्षणात १०-१४ वयोगटातील सुमारे दोन कोटी शालेय विद्यार्थी तंबाखूच्या व्यसनाच्या आहारी गेल्याचे समोर आले. याच सर्वेक्षणानुसार तब्बल साडेपाच हजार विद्यार्थी दररोज या व्यसनाला बळी पडतात. शालेय विद्यार्थ्यांमध्ये तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन करणाऱ्यांचे प्रमाण सुमारे साडेआठ टक्के आहे. सातवा वाढदिवस साजरा करण्यापूर्वीच ११.४ टक्के मुले धूम‘पान करतात तर २४ टक्के तंबाखूजन्य पदार्थाच्या आहारी जातात. आतातर तंबाखूपेक्षा धोकादायक असणाऱ्या अमली पदार्थाचे सेवन करण्याचे आकर्षण विद्यार्थ्यांमध्ये वाढत आहे. सिगारेट, हुक्का पार्लर, ई-सिगारेट हा तारुण्याच्या उंबरठ्यावर असणाऱ्यांसाठी प्रतिष्ठेचे ठरत आहे. यात मुलांसोबतच मुलींची सं‘या चिंताजनक असल्याचे दिसून येते.

खरं म्हणजे या आणि अशा प्रकारच्या अनेक समस्यांना बदलती कुटुंब व्यवस्था कारणीभूत आहे का, याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. समाजामध्ये ‘मी आणि माझे’ हा बळावत असलेला संकुचित विचार, स्वकेंद्रित मानसिकता, पाश्चात्त्यांचे अंधानुकरण आणि भौतिक सुखांचा हव्यास यामुळे आपल्या संस्कृतीचे बलस्थान असलेली कुटुंब व्यवस्था गतीने बदलत आहे आणि या नकोशा बदलामुळे नवनवीन समस्या सामोरे येत आहे. वास्तविक कुटुंब व्यवस्थेतून होणारी जीवनमूल्यांची रुजवण, नकळत मिळणारे संस्कार चारित्र्यसंपन्न पिढी घडविते. याच संस्कारांचे प्रतिबिंब समाजात वावरताना उमटते. दुर्दैवाने कुटुंब व्यवस्थेची, त्यातून मिळणाऱ्या संस्कारांची वीण सैल होत असल्याचे चित्र आहे. या समस्येवर केवळ चर्चा करून व केवळ विचार व्यक्त करून उपाय मिळणार नाही. त्यासाठी आपल्या सर्व परिवारांना, समाजातल्या प्रत्येक कुटुंबातील सदस्यांनी व विशेषत: आई-वडिलांनी आपल्या पूर्वापार परंपरा, रूढी, सणोत्सव यांना प्राधान्य दिले पाहिजे. आपले पूर्वीचे जीवन जसे बाळबोध म्हटले जात होते ते संस्काराचे केंद्र होते. यातून जी पिढी तेव्हा पुढे आली तेव्हा त्यात महान विचारक, समाजसेवक असे अनेक क्षेत्रातील धुरिण निर्माण झालेत. घराघरांतून होणारे संस्कार लुप्त झाल्याने व्यसनाधीनतेसह अनेक समस्या निर्माण होत आहेत. यावर मात करण्यासाठी कुटुंब व्यवस्था पुन्हा संस्कार आणि संवादक्षम व्हावी.

९४२२८६२४८४


## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# कुर्बानी कोण देणार?

लोकसभा असो किंवा विधानसभा, राज्यसभा असो किंवा विधान परिषद या निवडणुकांची चाहुल लागली की, महाराष्ट्रातील राजकारणात वेगळाच सळसळाट उसळतो. त्याचाच प्रत्यय आता भारत निवडणूक आयोगाने १६ मार्च रोजी राज्यसभेच्या निवडणुकांची तारीख जाहीर करताच महाविकास आघाडीच्या तंबूत बघायला मिळत आहे. महाराष्ट्रातून सात जागांसाठी निवडणूक होत असली, तरी महाविकास आघाडीच्या संख्याबळानुसार त्यांच्या वाट्याला प्रत्यक्षात एकच जागा निश्चित मानली जात आहे; आणि तिथूनच सुरू होतो तो प्रश्न ‘कुर्बानी नेमकी कोण देणार?’ कोणासाठी? आणि कशासाठी?

माढा निवडणुकीत आपली आता ही शेवटची निवडणूक म्हणून जाहीर करणारे शरद पवार राजकारणातून निवृत्ती घेतील, मार्गदर्शक म्हणून काम करतील अशी अपेक्षा होती. शरद पवारांचे पुतणे दिवंगत नेते अजित पवार यांची तशीच इच्छा होती. त्यांची ही इच्छा पूर्ण न होताच ते आपल्यातून निघूनही गेलेत. मात्र, शरद पवारांची इच्छा काही संपता संपेना झाली आहे. यावेळी पुन्हा शरद पवार यांनी राज्यसभेत जाण्याची स्वतः इच्छा व्यक्त करून, केवळ राजकीय वर्तुळात नव्हे, तर मविआत खळबळ उडवून दिली आहे. बरं, पवारांनी आपली इच्छा कोणाच्या तोंडून व्यक्त केली, तर संजय राऊत यांच्या... उबाठा गटाचे खासदार संजय राऊत यांनी पवारांनी स्वतः राज्यसभेवर जाण्याची इच्छा व्यक्त केल्याचा दावा करीत या चर्चेला अधिकृत स्वरूप दिलं. देशाला अनुभवी नेतृत्वाची गरज आहे, असा मुद्दा पुढे केला गेला. महाराष्ट्राच्या अस्मितेसाठी, मराठी माणसाचा आवाज संसदेत जोरकसपणे मांडण्यासाठी शरद पवारांचं राज्यसभेत जाणं महत्त्वाचं असल्याचं संजय राऊत म्हणत आहेत. मात्र, ८५ वर्षांच्या थकलेल्या, गंभीर आजारामुळे बोलण्याची थोडी अडचण असणाऱ्या व्यक्तीपेक्षा एखाद्या तरुण नेत्याला, उमेदवाराला जर संधी दिली तर तो मराठीचा आवाज अधिक जोरकसपणे मांडेल, असे राऊतांना का वाटू नये? की, उबाठा आणि शरद पवारांच्या पक्षात दुसरा कोणताही मराठी नेता, तरुण सक्षम नाही, असे राऊतांना सुचवायचे आहे का? एकही मराठी माणूस लायक नसल्यामुळेच मागील वेळी प्रियांका चतुर्वेदी या हिंदी महिलेला राज्यसभेवर पाठविले होते का? हे देखील गंभीर प्रश्न राऊतांच्या या भूमिकेमुळे निर्माण झाले आहेत.



**विधान परिषद : सत्तेचा दुसरा दरवाजा आणि बेगमी**

मे महिन्यात विधान परिषदेच्या काही जागा रिक्त होत आहेत. त्यात उद्धव ठाकरे हेदेखील निवृत्त होत आहेत. त्यामुळे ठाकरे पुन्हा विधान परिषदेत जावेत, अशी उबाठा गटातील अनेकांची इच्छा आहे. पक्षप्रमुख म्हणून विधिमंडळात त्यांची उपस्थिती आवश्यक असल्याचा दावाही संजय राऊतांनीच केला आहे. राऊतांचा हा दावा म्हणजे सरळसरळ सौदेबाजीचेच संकेत होय. अर्थात शरद पवार राज्यसभेला आणि ठाकरे विधान परिषदेला, अशी ही राजकीय बेगमी केली जात असल्याचं स्पष्ट होत आहे. पण या व्यवहारात काँग्रेस कुठे आहे? मविआतील दोन पक्षांनी आपआपला स्वार्थ साधला, तोदेखील काँग्रेसला न विचारता, काँग्रेसच्याच जिवावर स्वतः निर्णय घेऊन दोघेही मोकळे झाले आहेत.

महाविकास आघाडीत काँग्रेस हा तिसरा, पण निर्णायक घटक आहे. संख्याबळानुसार दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष असलेली काँग्रेस यावेळी गप्प बसण्याच्या मनस्थितीत नाही. काँग्रेसकडून राष्ट्रवादी काँग्रेसने विलीनीकरणाच्या चर्चांबाबत भूमिका स्पष्ट करावी आणि राज्यसभा किंवा विधान परिषद, यापैकी किमान एक जागा काँग्रेसला द्यावी, अशी भूमिका घेतली जात आहे. हा केवळ दबावाचा डाव आहे की प्रत्यक्षात पर्याय उभा करण्याची तयारी, हे अद्याप स्पष्ट नाही. एवढं मात्र नक्की, यावेळी काँग्रेस स्वतःला केवळ प्रेक्षकाच्या भूमिकेत ठेवणार नाही आणि या दोघांच्या दबावतंत्राला बळी पडणार नाही. राजकारणात विचारधारा असते, पण राजकीय गणित अर्थात व्यवहारदेखील असतं. पवार दिल्लीला गेले, तर ठाकरे विधान परिषदेत हा ‘पॅकेज डील’ काँग्रेसला कितपत मान्य होईल? यातून काँग्रेसला काय फायदा होईल? हे यावेळी काँग्रेस बारकाईने बघणार, काँग्रेसची भूमिका येथे निर्णायक दिसत आहे. कारण ‘एक जागा’ या मर्यादेमुळे कोणाचंही स्वप्न दुसऱ्याच्या त्यागावर उभं राहणार आहे. त्यामुळं आता विचारधारा आणि व्यवहार दोन्हीचा कस लागणार आहे.

**‘कुर्बानी’ की ‘कुशल डाव?’**

राजकारणात त्याग ही संकल्पना भाषणात शोभते. प्रत्यक्षात मात्र प्रत्येक पक्ष आपला राजकीय स्वार्थ साधण्याच्या प्रयत्नात असतो. उबाठाचं म्हणणं, संख्याबळ आमचं सर्वाधिक. राष्ट्रवादीचा युक्तिवाद, आमचं नेतृत्व राष्ट्रीय पातळीचं. काँग्रेसचा सवाल, आमचा वाटा काय? काँग्रेसला या समीकरणात समाधानकारक पर्याय द्यावा लागेल. अन्यथा शेवटच्या क्षणी वेगळं गणित उभं राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. या तिघांच्या तिढ्यातून मार्ग काढणं सोपं नाही. कारण इथे केवळ एक जागेचा प्रश्न नाही तर इथे सगळे भविष्यातील आपली राजकीय गुंतवणूक बघत, फायदा बघत आहेत. राज्यसभेवर जाणं म्हणजे राष्ट्रीय राजकारणात स्थान. विधान परिषद म्हणजे राज्याच्या राजकारणात प्रभाव. दोन्ही पदं महत्त्वाची. त्यामुळे दोन्हीवर दावा करणं स्वाभाविक. पण मविआतील तीन पक्षांपैकी दोघांचा यात लाभ दिसत आहे. तिसऱ्याच पक्षाचं काय? आता काँग्रेसने चंद्रपूरची घटना विसरून परभणीत उबाठाला समर्थन देत ज्याप्रमाणे कुर्बानी दिली होती, त्याचप्रमाणे काँग्रेस पुन्हा ‘कुर्बानी’ देते की ‘कुशल डाव’ खेळते? हे बघणे औत्सुक्याचे ठरणार आहे. काँग्रेसने जर राज्यसभेसाठी स्वतःचा उमेदवार उभा करण्याचा निर्णय घेतला, तर महाविकास आघाडीत तणाव निर्माण होऊ शकतो आणि जर राष्ट्रवादीला बाजूला ठेवून काँग्रेस-शिवसेना एकत्र आली, तर तेही वेगळं चित्र उभं होईल. म्हणजेच आघाडीत एकमताचा दावा असला, तरी प्रत्यक्षात ज्याप्रमाणे उबाठाने काँग्रेसला सोडून मुंबई पालिका निवडणूक मनसेसोबत लढली, त्याचप्रमाणे काँग्रेसकडेही अनेक पर्याय खुले आहेत. कारण काँग्रेससाठी ही निवडणूक केवळ एका जागेची नाही तर आघाडीतल्या प्रभावाची आणि राजकारणातल्या अस्तित्वाची आहे. राजकारणात शेवटच्या क्षणी समीकरणं बदलण्याची परंपरा आपल्याला आता काही नवीन राहिलेली नाही.

९२७०३३३८८६

### सकारात्मक विचार करून परीक्षा द्या

दहावीची बोर्ड परीक्षा आजपासून म्हणजे २० फेब्रुवारीपासून सुरू होत असून ती १८ मार्चपर्यंत असणार आहे. बारावीची परीक्षा ११ मार्चपर्यंत चालणार आहे. या परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील मैलाचा दगड असतो. विद्यार्थ्यांच्या आयुष्याला कलाटणी देणाऱ्या या परीक्षा असतात म्हणूनच या परीक्षा विद्यार्थ्यांच्या जीवनात अतिशय महत्त्वाच्या असतात. दहावी-बारावीची बोर्ड परीक्षा म्हणजे विद्यार्थी आणि पालकांसाठी कमालीचे टेन्शन. करीअरच्या दृष्टीने आणि पुढील अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी बोर्ड परीक्षेच्या गुणांना खूप महत्त्व असते. त्यामुळे विद्यार्थी वर्षभर भरपूर अभ्यास करत असतात. पण प्रत्यक्ष जेव्हा परीक्षा जवळ येते तेव्हा मात्र विद्यार्थ्यांचे टेन्शन वाढते. मात्र, या काळात विद्यार्थ्यांनी टेन्शन फ्री राहणे गरजेचे आहे. नकारात्मक विचार घेऊन जर विद्यार्थी परीक्षेला गेला तर त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी परीक्षा कालावधीत प्रसन्न राहावे. सतत अभ्यास करण्याऐवजी मध्येमध्ये ब्रेक घ्यावा. मित्रांशी अन्य विषयांवर चर्चा करावी, आवडती पुस्तके वाचणे अशा गोष्टी कराव्यात. रात्री जागरण करणे टाळावे. परीक्षा कालावधीत मोबाईलपासून दूरच राहावे. अभ्यासाचा खूप ताण आल्यास विश्रांती घ्यावी. घरी बनवलेलेच जेवण वेळेवर करावे. पालकांनीही या काळात सकारात्मक राहावे. आपल्या पाल्यांवर अभ्यासासाठी दबाव आणू नये. विद्यार्थी परीक्षेचे टेन्शन न घेता सकारात्मक विचार घेऊन परीक्षेला गेला तर यश निश्चित मिळेल.

**श्याम ठाणेदार** /९९२२५४६२९५

●● ●●

### शिवचरित्राने डोळे उघडले पाहिजे

हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र म्हणजे कर्मयोगी तत्त्वज्ञानाचा जिवंत साक्षात्कार आहे. राष्ट्रधर्माचे आणि समाजधारणेचे महान तत्त्वज्ञान आहे. हे चरित्र केवळ एका व्यक्तीचे नाही तर ते हिंदवी स्वराज्यचे आणि हिंदवी समाजाचे चरित्र आहे. ज्यांना आपले राष्ट्र सार्वभौम, सामर्थ्यशाली, समृद्ध आणि अजिंक्य बनवायचे असेल त्यांनी ते हृदयात जपले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांना हिंदुत्वाचा अभिमान होता. आपला धर्म, आपले स्वराज्य, आपली संस्कृती याचे रक्षण हा त्यांच्या स्वराज्य स्थापनेच्या अनेक उद्धेशापैकी एक होता. म्हणूनच शिवचरित्राचा आदर्श आमच्या डोळ्यापुढे डोळसपणे ठेवला पाहिजे. या तेजस्वी चरित्राने आमचे केवळ डोळे दिपता कामा नयेत, ते उघडले गेले पाहिजे असे म्हणावे वाटते.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

●● ●●

## वाचक पत्रे

### डिलिव्हरी बॉईजच्या मागण्यांची पूर्तता करा

ऑनलाईन खरेदीचे प्रमाण प्रचंड वाढलेले आहे. घरबसल्या वस्तू खरेदी करून खरेदीची हौस जिरविणाऱ्यांची संख्या सतत वाढतच आहे.



त्यातच खाद्यपदार्थ मागवण्याचा प्रकारही शहरी भागात लोकप्रिय आहे. त्यासाठी वेगवेगळ्या कंपन्या सेवा पुरवीत असतात. त्यात वरचेवर स्पर्धादेखील वाढत चालली आहे. अशा डिलिव्हरी बॉईजना गिग वर्कर्स म्हटले जाते. त्यांच्या हक्क-अधिकारांचा विचार सध्या कुणीच करायला तयार नाही. खाद्यपदार्थांची ने-आण वेळेवर व्हावी यासाठी हे तरुण कामगार कायम धडपड करीत असतात. महानगरांमधील धावपळीच्या किंवा धकाधकीच्या जीवनात प्रत्येकासाठी वेळ अतिशय महत्त्वाचा असतो. कशाचीही तमा न बाळगता हे डिलिव्हरी बॉईज वर्कर्स आपले काम इमाने-इतबारे करीत असतात. वेळ वाचावा म्हणून ते प्रसंगी वाहतुकीचे नियमही पाळत नाहीत. अतिशय घाईमध्ये ऑर्डर वेळेत पोहोचविण्याची त्यांची लगबग असते. एखाद्या वेळेस उशीर झाल्यास ग्राहकांची बोलणीदेखील खावी लागतात. त्यामुळेच त्यांना धावाधाव करण्याशिवाय दुसरा पर्याय नसतो. खाद्यपदार्थ गरम असेल तर त्यांच्या धावपळीचे चीज होते. अन्यथा कंपनीकडूनदेखील त्यांच्यावर दंड ठोठावला जातो. अलिकडेच देशातील लाखो डिलिव्हरी बॉईजनी आपल्या प्रमुख मागण्यांसाठी संप पुकारला होता. सध्या देशात सव्वा कोटी डिलिव्हरी बॉईज या क्षेत्रात असल्याची आकडेवारी प्रसिद्ध झाली. या व्यवसायाची व्याप्ती वाढतच चालली असल्यामुळे डिलिव्हरी बॉईज यांचे महत्त्व वाढत आहे. मात्र, त्यांना मिळणारी वागणूक आणि मोबदला यावर सरकारकडून विशेष लक्ष दिले जाण्याची गरज आहे. नोकरीची शाश्वती, डिलिव्हरी पोच करण्याची वेळ वाढावी, किमान वेतन मिळावे तसेच कामाची वेळ आठ तासांची करावी इत्यादी मागण्यांवर सकारात्मक दृष्टीने विचार होणे आवश्यक आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# ग्रामपंचायतींचा कार्यकाळ संपला; प्रशासक राज सुरू

## इच्छुकांची नजर निवडणूकांच्या तारखेकडे

तभा. वृत्तसेवा

**केज |** केज तालुक्यातील ११४ ग्रामपंचायतींपैकी २३ ग्रामपंचायतींच्या सरपंच व सदस्यांचा पाच वर्षांचा कार्यकाळ १६ फेब्रुवारी रोजी संपुष्टात आला आहे. त्यामुळे या सर्व ग्रामपंचायतींवर शासनाने प्रशासकांची नियुक्ती केली असून, आता पुढील सार्वत्रिक निवडणुका कधी होणार याकडे इच्छुक उमेदवारांसह नागरिकांचे लक्ष लागले आहे.जानेवारी २०२१ मध्ये झालेल्या निवडणुकांनंतर या ग्रामपंचायतींमध्ये सरपंचांची निवड सदस्यांमधून करण्यात आली होती. त्या वेळी सरपंच व उपसरपंच हे बहुतांश ठिकाणी एकाच गटातील निवडून आले होते. मात्र आता कार्यकाळ पूर्ण झाल्याने नवीन पदाधिकाऱ्यांच्या निवडीपर्यंत प्रशासकीय कारभार हाती घेण्यासाठी पंचायत समितीच्या विस्तार अधिकाऱ्यांपासून ते शाखा अभियंत्यांपर्यंत विविध अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या २३ ग्रामपंचायतींचा समावेश

केज तालुक्यातील बोबडेवाडी, मुंडेवाडी, आंधळेवाडी, पैठण, विडा/गौरवाडी, येवता, धोतरा, दरडवाडी, जाधवजवळा, काशिदवाडी, सुकळी, बानेगाव, रामेश्वरवाडी-ढाकणवाडी, घाटेवाडी, गप्पेवाडी/नामेवाडी, वाधेबाभळगाव, नारेवाडी, पाथरा, भोपला, मोटेगाव, लाखा, कोरडेवाडी आणि शिंदी या २३ ग्रामपंचायतींच्या निवडणुका जानेवारी २०२१ मध्ये पार पडल्या होत्या. आता या सर्व ठिकाणी निवडणूक प्रक्रियेची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

प्रभाग रचनेची प्रक्रिया सुरू

शासनाने प्रभाग रचनेच्या प्रक्रियेला या महिन्याच्या २७ तारखेपासून सुरुवात करण्याचा निर्णय घेतला असून ४ मेपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण होणार आहे. प्रभाग रचना पूर्ण झाल्यानंतरच निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता आहे.

## खोटा धनादेश प्रकरणी ६ महिने कारावास व ३ लाखांची नुकसान भरपाई

तभा. वृत्तसेवा



**परळी वैजनाथ |** खोटा धनादेश दिल्याच्या आरोपावरून परळी येथील सरस्वती विद्यालय या शाळेतील लिपिकास परळी न्यायालयाने सहा महिने कारावास व ३ लाख रुपये नुकसान भरपाईची शिक्षा ठोठावली.

थोडक्यात वृत असे की परळी येथील सरस्वती विद्यालय येथील सेवानिवृत्त लिपिक आरोपी शिवाजी वैजनाथ जगताप यांनी घरगुती अडचणीसाठी हातउसणे परळी येथील फिर्यादी गोविंद बालासाहेब सोनवणे यांच्याकडुन दिनांक २९.०७. २०२० रोजी ३ लाख रुपये हात उसणे घेतले होते. सदर रक्कमेच्या परतफेडीकरिता दिनांक.१२.०८.२०२१ रोजीचा रुपये ३००००० चा स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा गांधी मार्केट परळी वैजनाथ या बँकेचा धनादेश दिला .सदर धनादेश न वटल्यामुळे फिर्यादी यांनी परळी न्यायालयात कलम १३८ नि.ई.अँक्टखाली फिर्याद दाखल केली. प्रकरणाची सुनावणी परळी न्यायालय झाली. फिर्यादीचा युक्तीवाद मान्य करून आरोपी शिवाजी वैजनाथ जगताप यास उपरोक्त ६ महिने कारावासाची शिक्षा ठोठावली.तसेच आरोपींने फिर्यादीस ३ लाख रुपये नुकसान भरपाई दसादशे ९ टक्के व्याज दराने केस दाखल केल्यापासून ते वसुली होईपर्यंत द्यावी.नुकसान भरपाई नाही दिल्यास आरोपीला पुन्हा दोन महिने कारावास भोगावा लागणार आहे.फिर्यादीच्या वतीने ॲड प्रदीप गिराम ॲड प्रणव मराठे ॲड सुल्तान सय्यद ॲड उमेश घोडके यांनी काम पाहिले.त्यांना ॲड प्रकाश मराठे यांनी मार्गदर्शन केले.

## नानाजी देशमुख विद्या मंदिर येथे शिवजयंती उत्साहात साजरी



**बीड |** दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ गुरुवार रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन नानाजी देशमुख विद्यामंदिर च्या मुख्याध्यापिका अर्चना ताई मोराळे व गोकुळ शिशु वाटिका प्रमुख आरती ताई जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी क्रांती ताईंनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची माहिती सांगितली.. गनिमी कावा, मजबूत नौदल, कुशल प्रशासन ही महाराजांच्या नेतृत्वाची मुख्य वैशिष्ट्ये होती. महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केले. यावेळी सूत्रसंचालन स्वाती देशपांडे यांनी केले. मा.डॉ.सीमाताई जोशी, मा.ॲड. अर्चनाताई तुंगार, मा.गंगाधर जी देशमुख सर, मा.श्रीमती सुनंदाताई कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## छत्रपती शिवरायांचे विचार आत्मसात करण्याची गरज- डॉ. हनुमंत सौदागर



**केज |** आजच्या काळात मार्गदर्शक मूल्य देणारे विचार शिवचरित्रात आहेत.महिलांनी राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवरायांचे विचार आत्मसात करण्याची गरज असल्याचे मत डॉ हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले. ते केज येथील समर्थनगर येथे दि (१९) छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त प्रमुख मार्गदर्शन म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षा जिजाऊ ब्रिगेडच्या राधाताई सपकाळ,प्रमुख व्याख्याते डॉ हनुमंत सौदागर,अँड अनिता मुंडे,श्रीमती जाधव,श्रीमती देशमुख,श्रीमती डॉ बोबडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलतांना डॉ सौदागर म्हणाले महिलांनी आपल्या मुलांना जिजाऊ,शिवराय बनवावे,अंधश्रद्धा कर्मकांड सोडून द्यावे. शिवरायांचे विचार केवळ पाठांतर न करता ते मनात रुजवावे लागतील प्रत्यक्ष कृतीत उतरावे लागतील छत्रपती शिवराय म्हणजे ऊर्जा स्त्रोत आणि प्रेरणास्थान आहेत. महापुरुषांना जाती धर्मामध्ये विभागून राजकारण साधले जात आहे हे ओळखून जयंती नाही तर वाचून साजरी केली पाहिजे. नैतिक मूल्य जोपासली पाहिजेत. शिवरायांचा विचार संकटकाळात लढण्याचे बळ देतो असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्तविक श्रीमती जाधव यांनी केले.

## प्रा. ओमप्रसाद सारगे लिखित भौतिकशास्त्राच्या पुस्तकाचे प्रकाशन



**माजलगाव प्रतिनिधी |** सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विषयाचे प्रा. ओमप्रसाद सारगे यांनी लिखित "Application of Mathematical Physics in Electricity and Magnetism" या पुस्तकाचे प्रकाशन प्राचार्य डॉ. जी. के. सानप यांच्या हस्ते संपन्न झाले. प्रा.ओमप्रसाद सारगे यांचे हे पुस्तक नवीन शैक्षणिक धोरणानुसार तयार करण्यात आले असून त्यामध्ये भौतिकशास्त्रातील संकल्पना सोप्या व समजण्यास सुलभ पद्धतीने मांडण्यात आल्या आहेत. भौतिकशास्त्रातील अनेक संकल्पना समजून घेण्यासाठी गणिताची भक्कम पायाभूत माहिती आवश्यक असते. हे पुस्तक त्या संकल्पना पद्धतशीरपणे स्पष्ट करते, त्यामुळे विद्यार्थ्यांना विषय अधिक सुलभ होणार आहे. बी.एस्सी., भौतिकशास्त्र, अभियांत्रिकी, पॉलिटेक्निक तसेच भौतिकशास्त्र विषयाची आवड असलेल्या सर्व विद्यार्थ्यांसाठी हे पुस्तक मार्गदर्शक ठरणार आहे. प्रकाशन सोहळ्या प्रसंगी प्राचार्य डॉ. जी. के. सानप, प्रभारी प्राचार्य डॉ. एन. के. मुळे, उपप्राचार्य डॉ. एम. ए. कव्हळे, उपप्राचार्य प्रा. पवनकुमार शिंदे, उपप्राचार्य प्रा. प्रकाश गवते, प्रबंधक डॉ. प्रशांत चव्हाण तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

## रविवारी पोलीस पाटील भरतीसाठी परीक्षा

**बीड |** जिल्ह्यातील पोलीस पाटील पदांच्या रिक्त असलेल्या तब्बल ११७९ जागांसाठी येत्या रविवारी दि.२२ फेब्रुवारी रोजी लेखी परीक्षा होणार असून, या परीक्षेसाठी प्रशासनाने अभूतपूर्व तयारी केली आहे. सकाळी ११ ते दुपारी १२.३० या वेळेत होणाऱ्या या परीक्षेसाठी जिल्ह्यातील बीड, आष्टी, माजलगाव, अंबाजोगाई आणि परळी या शहरांतील ३३ परीक्षा केंद्रांवर एकूण ११,३२५ उमेदवार बसणार आहेत. परीक्षा प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक आणि कोणत्याही अनुचित प्रकाराविना पार पाडण्यासाठी प्रत्येक उपविभागीय दंडाधिकारी स्तरावर अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांना परीक्षेसंदर्भात आवश्यक प्रशिक्षण देण्यात आले आहे.

## शिवरायांनी उभारलेले स्वराज्य सर्वसामान्यांच्या सन्मानासाठी होते - डॉ. तात्यासाहेब मेघारे

तभा. वृत्तसेवा

**गेवराई |** शिवाजी महाराजांनी उभारलेले स्वराज्य हे केवळ भौगोलिक विस्ताराचे स्वप्न नव्हते, तर ते सामान्य माणसाच्या सुरक्षिततेसाठी, सन्मानासाठी व न्यायासाठी उभे राहिलेले लोकशाही मूल्यांचे बीज होते, असे प्रतिपादन डॉ.तात्यासाहेब मेघारे यांनी केले.

गेवराई येथील सिध्दीविनायक कॉलनी येथे १९फेब्रुवारी रोजी शिवजयंती चे अयोजन केले होते.या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर तौर हे होते.पुढे बोलतांना मेघारे म्हणाले की छत्रपती शिवराय यांनी आठरा पगड जाती ला सोबत घेऊन स्वराज्याची निर्मिता केली.त्यांच्या राज्यात सर्वांना समान न्याय होता. लोकाभिमुख प्रशासन,न्याय निष्ठा,महिला विषयी असलेला सम्मान शेतकरी, सामान्य जनते बद्दल संवेदनशीलता त्यांच्या राज्यात होती.त्यामुळे आजच्या राज्यकर्त्यांनी त्यांचे आदर्श घेऊन प्रशासन चालविण्याची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

या वेळी कार्यक्रमास कॉलनीतील प्रा.संदीपान हिंगे,प्रा.सतिष चव्हाण, अँड. अशोक शिंदे,अँड.दिलीप मोटे, प्रमोद देसले,बाबासाहेब बटुळे,दिपक शिरसागर,अनिल तौर,तलाठी शेंबडे पाटाल,सुदर्शन निकम,गणेश तौर ,पियुष बटुळे,समर्थ गायकवाड,गोविंद मोटे,युवराद शिरसागर, आदी सह महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे संचलन अँड.दिलीप मोटे तर आभार पियुष बटुळे यांनी मानले.

## कांद्याच्या पिकात अफूची लागवड; पाच लाखांचा मुद्देमाल जप्त

तभा. वृत्तसेवा

**बीड |** स्थानिक गुन्हे शाखा बीड यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून आष्टी तालुक्यातील पिंपळा शिवारात एका शेतात धाड टाकण्यात आली. या कारवाईत परसराम मोहन जगधने या शेतकऱ्याने आपल्या कांद्याच्या पिकात लपवून केलेली अफूची बेकायदेशीर शेती उघडकीस आली आहे. पोलीस पथकाने रात्रीच्या सुमारास छापा टाकला असता, आरोपी आपल्या शेतात अफूच्या झाडांचे संवर्धन आणि जोपासना करताना मिळून आला. त्याच्या ताब्यातून पोलिसांनी सुमारे २० किलो वजनाची अफूची झाडे



जप्त केली आहेत. जप्त करण्यात आलेल्या या झाडांना बोंडे आणि फुले आलेली असून, त्याची बाजारपेठेतील अंदाजे किंमत ५ लाख रुपये इतकी आहे.

या प्रकरणी अंभोरा पोलीस ठाण्यात गुन्हा रजीस्टर क्रमांक ४६/२०२६ नुसार एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस प्रशासन करत आहे. ही यशस्वी कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय अधिकारी हानुपुडे पाटील आणि पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पार पाडली आहे. जिल्ह्यामध्ये अंमली पदार्थांचा प्रसार रोखण्यासाठी पोलिसांनी विशेष कक्ष स्थापन केला असून, नागरिकांनी अशा अवैध प्रकारांची माहिती देण्यासाठी ९२७०२४३२०० या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. माहिती देणाऱ्याचे नाव पूर्णपणे गुप्त ठेवण्यात येईल, असेही पोलीस दलाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

## संस्कारमध्ये बालसभेचे आयोजन

तभा. वृत्तसेवा

**बीड |** येथील संस्कार विद्यालयातील इयत्ता पहिली दुसरी विभागामध्ये चिमुकल्यांनी शिवजयंती अतिशय उत्साहात साजरी केली. या निमित्ताने बालसभेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थ्यांनी शिवजी महाराजांचा पाळणा, पोवाडे, शिवरायांचे ध्येय,स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा, अफजलखानाचा वध या प्रसंगावर आधारित आपले मनोगत व्यक्त करून, तसेच शिवरायांचे अनेक गीते सादर केली. त्यासोबतच अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून सर्व शिक्षक वृंदांची मने जिंकून घेतली .या निमित्ताने व्यासपीठावर माननीय मुख्याध्यापिका श्रीमती शोभाताई कुलकर्णी व व विभाग प्रमुख श्रीमती विद्याताई पारगांवकर उपस्थित होत्या. तसेच बालसभेच्या अध्यक्षा म्हणून दुसरी क मधील कुमारी तनुश्री बनसोडे, तर प्रमुख पाहुण्या म्हणून कुमारी आरोही शिराळे व्यासपीठावर उपस्थित होत्या. शेवटी चिरंजीव अनिरुद्ध रत्नपारखी याने सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

### लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना व भोगलवाडी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या विद्यमाने

## ऊसतोडणी कामगार आरोग्य तपासणी शिबीर

तभा. वृत्तसेवा

**माजलगाव |** लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्यात कार्यरत ऊसतोडणी वाहतुक कामगार, कर्मचारी,कामगारांच्या आरोग्याची दखल घेत त्यांच्या विविध आरोग्य तपासण्या करण्यासाठी लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना व भोगलवाडी प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी.या शिबीरात सर्व ऊस तोडणी कामगारांनी आपली आरोग्य तपासणी करून घ्यावी. असे आवाहन कार्यकारी संचालक आर.सी.बडगुजर,मुख्य शेतकी अधिकारी रवि देशमुख, वैद्यकीय अधिकारी डॉ.जाधव सुशिल जाधव, यांनी केले आहे.

लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याचे मार्गदर्शक तथा साखर संघाचे उपाध्यक्ष मा.आ. प्रकाशदादा सोळंके साहेब,जेष्ठ मार्गदर्शक मा.श्री.धैर्यशील काका सोळंके यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली व मा.चेअरमन विरेंद्र सोळंके, मा.व्हा.चेअरमन जयसिंहभैया सोळंके यांच्या नेतृत्वाखाली सोळंके कारखान्यातील सर्वच कामगार, कर्मचारी यांचे आरोग्याची प्रतिवर्षी आरोग्य तपासणी केली जाते.त्याप्रमाणेच याहीवर्षी ऊसतोडणी वाहतुक कामगार, कर्मचारी, कामगारांसाठी लोकनेते सुंदराराव सोळंके साखर कारखाना व भोगलवाडी प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले असुन, दि.२३ फेब्रुवारी रोजी सोमवारी सकाळी १०.०० वा. माता वैष्णवी देवी मंदीर ठिकाणी सदर शिबीर होणार आहे.या आरोग्य तपासणी शिबीरात रक्तातील साखर, रक्तदाब तपासणी, हिमोग्लोबीन तपासणी,बीएसआय मोजमाप, तसेच सामान्य वैद्यकीय सल्ला यांचा समावेश आहे. कारखान्यातील कामाच्या स्वरूपामुळे कारखान्यातील ऊसतोडणी कामगार, कर्मचारी, कामगारांची नियमित आरोग्य तपासणी करून घेणे अवश्यक आहे.या उपक्रमामुळे विविध आजारांचे लवकर निदान होऊन प्रतिबंध शक्य होईल. त्यामुळे एकाही कर्मचारी,कामगार,ऊसतोडणी कामगार यांनी यादिवशी गैरहजर न राहता आरोग्य शिबीरात उपस्थित राहुन, आपली आरोग्य तपासणी करून घ्यावी. असे आवाहन कार्यकारी संचालक श्री .आर.सी.बडगुजर, मुख्य शेतकी अधिकारी श्री.रवि देशमुख, वैद्यकीय अधिकारी श्री.डॉ. सुशिल जाधव, आदिंनी केले.

## आष्टी पोलिसांची मोठी कारवाई; दोन गावठी पिस्तूलसह चारचाकी गाडी जप्त

तभा. वृत्तसेवा

**आष्टी (प्रतिनिधी) |** सार्वजनिक शिवजयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस दल पूर्णपणे सतर्क असतानाच, एका गोपनीय बातमीदाराने दिलेल्या माहितीवरून पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. एका पांढऱ्या रंगाच्या आलिशान चारचाकी गाडीतून बेकायदेशीर अग्निशस्त्रांची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून ही कारवाई पूर्ण केली. या कारवाईत पोलिसांनी दोन गावठी पिस्तूल जप्त केले असून दोघांना ताब्यात घेतले आहे, तर एक आरोपी अंधाराचा फायदा घेऊन पसार झाला आहे.

संशयास्पद हालचालींवर आष्टी पोलिसांची नजर

मिळालेल्या माहितीनुसार, शिवजयंतीच्या काळात परिसरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांचे गस्त पथक तैनात होते. याच दरम्यान पोलीस निरीक्षकांना माहिती मिळाली की, काही अनोळखी इसम एका पांढऱ्या



रंगाच्या गाडीतून पिस्तूलसह वावरत आहेत. या माहितीचे गांभीर्य ओळखून तातडीने तपास पथक रवाना करण्यात आले. रात्रीच्या वेळी एका हॉटेलसमोर संशयास्पद स्थितीत उभी असलेली गाडी पोलिसांच्या निदर्शनास आली. पोलिसांनी अत्यंत सावधगिरीने या गाडीची घेराबंदी केली आणि त्यातील व्यक्तींची चौकशी सुरू केली.

पोलिसांनी जेव्हा या गाडीची आणि त्यातील व्यक्तींची पंचांसमक्ष कसून तपासणी केली, तेव्हा गाडीमध्ये एक काळ्या रंगाची पिशवी आढळून आली. या पिशवीची झडती घेतली असता, त्यामध्ये दोन गावठी बनावटीचे कट्टे (पिस्तूल) सापडले. या शस्त्रांची किंमत मोठी असून ती बेकायदेशीरपणे बाळगली जात असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी घटनास्थळावरून दोघांना ताब्यात घेतले आहे. मात्र, पोलिसांची चाहूल लागताच गाडीचा चालक आपल्या ताब्यातील वाहन सोडून पसार झाला. पोलिसांनी नंतर हे वाहन शोधून जप्त केले आहे.

या प्रकरणी संबंधित इसमांविरुद्ध विनापरवाना शस्त्र बाळगल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फरार असलेल्या आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथके रवाना झाली असून लवकरच त्याला जेरबंद करण्यात येईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

# सांस्कृतिक कार्यक्रमातून कलागुणांना वाव मिळतो - नगराध्यक्षा गिताभाभी पवार

### शानदार समारंभात बक्षिस वितरण

तभा. वृत्तसेवा

**गेवराई |** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात सांस्कृतिक कार्यक्रमाला अनन्यसाधारण महत्त्व असून, विविध सांस्कृतिक कार्यक्रमातून प्राथमिक, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो. त्यामुळे, सांस्कृतिक कार्यक्रमांना प्रोत्साहन दिले पाहिजे. असे प्रतिपादन गेवराई च्या नगराध्यक्षा गिताभाभी बाळराजे पवार यांनी येथे बोलताना केले.

बुधवार ता. १८ रोजी, वार बुधवार, भगवती टॉकीज परिसराच्या मैदानावर, गेवराई नगर परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सांस्कृतिक महोत्सवात त्या बोलत होत्या. व्यासपीठावर बाळराजे पवार, नायब तहसीलदार संजय सोनवणे , जिपचे माजी सभापती युद्धाजीत पंडित, पोलिस निरीक्षक किशोर पवार,

नगर परिषदेचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, उपाध्यक्षा रेवती घुंबार्डे,

गटनेते ॲड. राजेंद्र राक्षसभुवनकर, माजी नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, सभापती महेश सौंदरमल, सभापती बद्दुशेठ, नपचे सभापती शहेदाद भाई, उपसभापती सोनाली सुतार, नगरसेवक राजेश टाक, नगरसेविका अंकिता धोंडलकर,



सभापती प्रशांत राख, नगरसेवक शिनुभाऊ बेदरे, राजाभाऊ आर्दड, नगरसेवक आबासाहेब काकडे, माजी नगराध्यक्ष सुशिल जवंजाळ, उपाध्यक्ष दादासाहेब गिरी यांची उपस्थिती होती. नगराध्यक्षा गीताताई पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून, नगर परिषदेच्या स्वच्छता अभियानात सहभाग घेण्याचे आवाहन केले. उपस्थित मान्यवरांनी ही शुभेच्छापर संदेश दिला. नप ने आयोजित केलेल्या सांस्कृतिक महोत्सवात विविध शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून, बहारदार अभिनयातून लक्षवेधी कलाकृती सादर करून रंगमंचावर धमाल केली.

बुद्धिबळ स्पर्धा निकालात

प्रथम- संस्कार सिद्धार्थ नरवडे, चिन्तेश्वर प्राथ विद्यालय, द्वितीय - शिवतेज दिनेश औटे, केंब्रिज आय स्कूल ,प्रथम - प्राची प्रशांत राऊत

केंब्रिज आय स्कूल, द्वितीय - सिद्धी उमेश चौडिया, तुळजा भवानी स्कूल,

प्रथम - अश्विन मच्छिद्र दहीवाळ

विमला माध्यमिक विद्यालय,द्वितीय- रणवीर तुळशिराम सोळंके ,केंब्रिज आय स्कूल, प्रथम - विद्या शिवप्रसाद पोपळघट, सेंट झेवियर्स स्कूल ,द्वितीय - काव्य अमोल कनपुरे याने बाजी मारून यश संपादन केले.चित्रकला स्पर्धेत

प्रथम -अक्षरा राजेंद्र राठोड, सेंट झेवियर्स स्कूल,द्वितीय- महेश मधुकर तौर, शारदा विद्यामंदिर ,तृतीय- ओवी प्रवीण वावरे, केंब्रिज आय स्कूल,

प्रथम-महिमा लक्ष्मण सोनावणे, सेंट झेवियर्स स्कूल, द्वितीय - आराध्य अप्पासाहेब चव्हाण, केंब्रिज आय स्कूल,तृतीय-श्रुतिका लहू म्हेत्रे, विमला माध्यमिक विद्यालयाला मिळाले.रांगोळी स्पर्धेत प्रथम- सानिका आखरे, केंब्रिज आय स्कूल, द्वितीय-

वैष्णवी राम सोळंके,चिंतेश्वर प्रा विद्यालय ,तृतीय-आरोही प्रशांत जाधव,विमला विद्यामंदि,प्रथम-

गौरी दादासाहेब खडके,विमला माध्यमिक विद्यालय ,द्वितीय-प्राजक्ता अशोक कादे ,कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय ,तृतीय- आदिती महादेव पांचाळ,सेंट झेवियर्स स्कूल गेवराई यांचा नंबर आला.वक्तृत्व स्पर्धेत

प्राथमिक गटात प्रथम-

मोमीन अहमन आत्तार, मिल्लत इंग्लिश स्कूल,द्वितीय -ईश्वरी रामेश्वर भुते,तुळजा भवानी इंग्लिश स्कूल,

तृतीय-तृप्ती संभाजी नरवाडे,केंब्रिज आय स्कूल , माध्यमिक गटातून

प्रथम- प्रियांशु रविकांत लाड,सेंट झेवियर्स स्कूल,द्वितीय- मनस्वी दिनकर शिंदे,सेंट झेवियर्स स्कूल,

तृतीय- नेहा रमेश म्हस्के, केंब्रिज आय स्कूल गेवराई हिने बाजी मारून यश संपादन केले. शोभायात्रा व पथसंचालनात

जि. प कन्या प्रशाला गेवराई शाळेला प्रथम क्रमांक मिळाला.

न्यू इरा इंग्लिश स्कूल गेवराई या शाळेला द्वितीय तर केंब्रिज आय स्कूलने तृतीय क्रमांक पटकावला आहे.चॅम्पियन्स संघ म्हणून सेंट झेवियर्स स्कूल गेवराई यांना , उपविजेता संघाचा मान द केम्ब्रिज व्हली इंटरनशनल स्कूल गेवराईला देण्यात आला. कार्यक्रमाचे परिक्षण प्रकाश भुते , प्रशांत रूईकर, दिनकर शिंदे, सुशिल टकले, अंजली खोबरे, अमित गाडे यांनी केले. सूत्रसंचालन श्याम वादे, प्राची दरडे यांनी केले.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हिंगोलीत प्रोटोकॉल डिझाइनिंग व एक्स्ट्राम्यूनरलची राष्ट्रीय परिषद

## राष्ट्रीय परिषदेला देशभरातील ५०० प्रतिनिधींची उपस्थिती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ फेब्रुवारी**

शहरात प्रोटोकॉल डिझाइनिंग व एक्स्ट्राम्युरल फंडिंग संधी विषयक पहिल्या राष्ट्रीय परिषदेचा उद्घाटन समारंभ उत्साहात पार पडला. नव्याने स्थापन झालेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, हिंगोलीच्या शैक्षणिक उपक्रमांतर्गत आयोजित या परिषदेच्या माध्यमातून वैद्यकीय संशोधनाची जाणीव व दिशा दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. वैद्यकीय क्षेत्रात संशोधनाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत असून प्रत्येक वैद्यकीय व्यावसायिकाने संशोधनाभिमुख दृष्टीकोन स्वीकारणे आवश्यक असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

उद्घाटन प्रसंगी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांनी परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी शुभेच्छा देत संशोधनाधारित वैद्यकीय सेवेमुळे समाजाला अधिक परिणामकारक व वैज्ञानिक आरोग्यसेवा मिळू शकते, असे नमूद केले. आयोजक अध्यक्ष व अधिष्ठाता डॉ. चक्रधर मुंगल यांनी परिषदेचे प्रास्ताविक सादर करत प्रोटोकॉल डिझाइनिंग व बाह्य निधी संधींचे महत्त्व स्पष्ट केले. संशोधन प्रस्तावांची गुणवत्ता, नैतिक मानके आणि निधी प्राप्तीची प्रक्रिया यांविषयी या परिषदेत सखोल चर्चा होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

एमएमसी निरीक्षक डॉ. कांचन अग्रवाल यांची उपस्थिती लाभली. तसेच डॉ. क्ढठडच् डेंटल कॉलेज अँड हॉस्पिटल, हिंगोलीचे संचालक डॉ. हंसराज खुराना हेही कार्यक्रमास उपस्थित होते. मान्यवर वक्ते म्हणून डॉ. सचिन मुंबरे, डॉ. योगेश बहुरूपी, डॉ. सतीश वड्डे आणि डॉ. विजय डोम्पले, डॉ.गोपाल कदम यांनी सहभाग नोंदविला. विविध विषयांवरील शैक्षणिक मंडणीमुळे प्रतिनिधींना संशोधनविषयक मार्गदर्शन मिळणार आहे.

देशभरातून ५०० पेक्षा अधिक प्रतिनिधी या परिषदेत सहभागी झाले असून वैद्यकीय क्षेत्रातील संशोधनवृत्तीला चालना देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे. कार्यक्रमाच्या शेवटी आयोजक सचिव व उप-अधिष्ठाता डॉ. राजहर्ष हनमंते यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी बालरोग तज्ज्ञ डॉ गोपाल कदम यांनी नुकतेच आंतरराष्ट्रीय परिषदेत सादरीकरण केल्याबद्दल त्यांचाही मान्यवरांच्याहस्ते सत्कार करण्यात आला.

# वसमत शहर पोलिस ठाण्यात छत्रपती शिवाजी महाराज जयंती



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २२ फेब्रुवारी**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त वसमत शहर पोलीस स्टेशन येथे अत्यंत उत्साहपूर्ण, अभिमानास्पद आणि प्रेरणादायी वातावरणात जयंती सोहळा पार पडला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला हिंगोली जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नीलभ रोहन यांच्या हस्ते शिवप्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार सुधीर वाघ यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य, दूरदृष्टी, न्यायप्रियता आणि संघटन कौशल्य यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

शिवरायांनी स्वराज्य उभारताना प्रजेच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य दिले. आजचे पोलीस दलही त्याच तत्वांवर कार्य करत असून कायदा-सुव्यवस्था राखणे, नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करणे आणि गुन्हेगारीविरोधात कठोर कारवाई करणे हीच खरी शिवसेवा आहे, असे प्रतिपादन यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमास पोलीस निरीक्षक सुधीर वाघ यांच्यासह सहाय्यक पोलीस निरीक्षक, उपनिरीक्षक, कर्मचारी तसेच महिला पोलीस कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवारातील जैवविविधता जतन संवर्धन करा- शैलेंद्र तिवारी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ फेब्रुवारी**



गावातील प्रत्येकाने आपल्या गावशिवरातील जैवविविधता जतन व संवर्धन केल्याने प्रत्येकाची समृद्धी होईल असे प्रतिपादन राजस्थान येथील शैलेन्द्र तिवारी यांनी उगम ग्रामीण विकास संस्था येथे आयोजित केलेल्या एकदिवसीय कार्यशाळेत सांगितले.

शैलेन्द्र तिवारी हे राजस्थान येथील जैविविधता विषयातील शस्त्रज्ञ आहेत ते पुढे म्हणाले की जैविविधता ही पशू पक्षी, पीक, वनस्पती, प्राणी या सर्व बाबतीत असते. पूर्वीची संपन्न जैविविधता आता दिवसदिवसे विकलांग बनत चालली आहे. हे कोठेतरी थांबले पाहिजे नाहीतर आपल्याला व पुढच्या पिढीला जगणे मुश्किल होईल. असे होऊ नये म्हणून आपण प्रत्येकाने वृक्षरोपण करणे, पिकातील जैविविधता सांभाळणे, वनस्पति जैविविधता वृद्धीगंत करणे, पाण्यातील जैविविधताचे जतन व संवर्धन करणे, पक्ष्यांची संख्या वाढली पाहिजे ते ज्या झाडावर घरती बांधतात ती झाडेच आपण तोडून टाकतो हे थांबले पाहिजे, नदी बारमाही प्रवाहित केली पाहिजे . जलप्रदूषण टाकले पाहिजे, नदीकाठील गावताची थडी वाढली पाहिजे असे त्यांनी प्रतिपादन केले .

या कार्यक्रमात जयाजी पाईकराव, नितीन लेले, यांनी सुद्धा मार्गदशन केले या कार्यक्रमात प्रास्ताविक विकास कांबळे केले तर धनंजय पडघन यांनी सर्वांचे आभार माणले या कार्यक्रमात विठ्ठल कांबळे, अमोल चेंडके, रामराव खंदारे अमोल माहोरे आदींनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सहकार्य केले. या कार्यक्रमास कोंढुर, रुपुर, चाफनाथ, डिग्रस व सालेगाव येथील शेतकरी उपस्थित होते.

# वृत्तपत्र विक्रेता संघटनेकडून छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ फेब्रुवारी**



येथील बसस्थानक परिसरात गुरुवारी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंतीनिमित्य श्रमिक वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या वतीने शिव रायांच्या प्रतिमचे पूजन करून शिवजयंती साजरी करण्यात आली.

यावेळी ज्येष्ठ वृत्तपत्र विक्रेता एकनाथ पाचमासे यांच्या हस्ते प्रतिमाचे पूजन करण्यात आले. यावेळी वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र हलवाई, उपाध्यक्ष संदीप पांचमासे, हरीश कीर्तीवार, शेख शकील, माणिक पंडित, काशिनाथ कदम, दिलीप अपूर्वा, गजानन तळवणकर, जावेद पठाण, अनिस अहमद, चव्हाण, राघव टापरे, संजय साबळे,रवी हटकर आदी पेपर विक्रेता प्रतिनिधी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### मुख्याध्यापक संघाच्यावतीने सत्कार



हिंगोली- जिल्हा मुख्याध्यापक संघातर्फे नवीन रुजू झालेले शिक्षणाधिकारी माध्यमिक विपूल भागवत यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित हिंगोली जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष डॉ प्रकाश अंभोरे, जिल्हा शिक्षण संवर्धन मंडळाचे अध्यक्ष दिगंबर हामदे सर, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे बोर्ड मेंबर प्राचार्य विठ्ठल मुटकुळे, प्राचार्य बाबासाहेब इंगोले मुख्याध्यापक काळे, एल. बी.शिंदे, मुख्याध्यापक मन्नान, कार्यालय अधीक्षक कोंडावार यांची उपस्थिती होती.

### शिरड शहापूरात बार्टीतर्फे शिवजयंती साजरी



औंढा नागनाथ- तालुक्यातील शिरड शहापूर येथील शांती विद्या मंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा येथे छ. शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्य छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यामध्ये महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग अंतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर व संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टीचे समतादूत अॅड.सुकेश कांबळे, प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ गोंवदे (बार्टी) यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन कार्य या विषयावर वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक काळे यांचेहस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सदरील वकृत्व स्पर्धेत अनेक मुला-मुलींनी भाग घेतला होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आनंद महाजन यांनी केले. पी. एन.काळे व रोकडे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. वकृत्व स्पर्धेचे परीक्षक म्हणून एम.टी.चव्हाण व निशा महाजन यांनी काम पाहिले. या कार्यक्रमात गोसावी अनेकांत व्ही. एस. स्वामी, डि.जी.भुसारे, ए.टी. पुरी, जी.डी.कल्याणकर आदींची उपस्थिती होती.

### बाळशास्त्री जांभेकर जयंतीनिमित्त अभिवादन

हिंगोली- दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हा माहिती कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी उपसंपादक चंद्रकांत कारभारी, लिपिक मनोहर भारती, गंगा देशमुख उपस्थित होते.

# हिंगोलीत दोन दिवशीय ग्रंथोत्सवाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ फेब्रुवारी**

राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय तसेच जिल्हा येथील ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने हिंगोली येथे दिनांक २८ फेब्रुवारी व ०१ मार्च २०२६ रोजी दोन दिवसीय 'ग्रंथोत्सव २०२५'चे आयोजन करण्यात आले आहे.

ग्रंथप्रसार, ग्रंथप्रदर्शन व ग्रंथविक्री हा या ग्रंथोत्सवाचा मुख्य उद्देश असून प्रकाशक, ग्रंथविक्रेते व ग्रंथप्रेमी वाचकांना एकत्र आणण्याचा हा उपक्रम आहे. या निमित्ताने जिल्ह्यातील मान्यवर साहित्यिकांच्या सहभागातून परिसंवाद,काव्यवाचन,व्याख्याने, वक्तृत्व स्पर्धा आदी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. वाचनाची आवड वृद्धिंगत व्हावी व साहित्यिक चळवळीला चालना मिळावी, हा या उपक्रमामागील हेतू आहे.या ग्रंथोत्सवात सन २०२५-२६ मध्ये राज्य शासन किंवा विविध नामांकित संस्थांकडून पुरस्कार प्राप्त झालेल्या जिल्ह्यातील साहित्यिकांचा सन्मान करण्यात येणार आहे. संबंधित साहित्यिकांनी आपली नावे व तपशील कार्यालयात नोंदवावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.जिल्ह्यातील नवोदित कवींना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. कविता सादर करू इच्छिणाऱ्या नवोदित कवींनी आपल्या नावाची नोंदणी कार्यालयात करावी. तसेच ग्रंथप्रदर्शन व ग्रंथविक्रीसाठी स्टॉल उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

# एकत्रीकरणासाठी गोरेगाव येथे हिंदू संमेलन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ फेब्रुवारी**

गोरेगाव उपखंडाचे हिंदू एकता संमेलन दि २० फेब्रुवारी रोजी संपन्न झाले. गोरेगाव येथील संत गजानन महाराज मंदिराच्या सभागृहात सामाजिक भावनेतून हिंदू समाजाला एकत्र करण्यासाठी हिंदू एकता संमेलन संपन्न झाले.

या संमेलनाला प्रमुख वक्ते म्हणून हिंदू विचारवंत तथा देवगिरी प्रांत संपर्क प्रमुख इंद्रजीत बैस होते. त्यांनी आपल्या वक्तव्यात सामाजिक समरसता, नागरी कर्तव्य, कुटुंब प्रबोधन, स्वबोध आणि पर्यावरण संरक्षण ह्या द्वारे हिंदू एकता कशी करता येईल या विषयाची सविस्तर मांडणी केली. प्रत्येक हिंदू परिवार हा आपल्या वागणुकीतून कशी देशसेवा करीत आहे आणि करू शकतो हे उदाहरणासह उपस्थित हिंदू समाजाला सांगितले.ह्या कार्यक्रमाला प्रमुख संत म्हणून स्वामी स्वरुपानंद सरस्वती महाराज, तर अध्यक्ष म्हणून हरी भक्ती परायण शिव कीर्तनकार गजेंद्र महाराज कावरखे हे होते. तर हिंदू एकता संमेलन समिती प्रमुख म्हणून विकास धोंडूजी खिल्लारी होते. महिला या देशाचे महत्वाचे अंग आहे आणि हिंदू समाजाला आणि परिवाराला दिशा देण्याची महत्वाची जबाबदारी ही घरातील कर्ती हिंदू महिला म्हणून आपलीच आहे असे वक्तव्य ह्या कार्यक्रमाच्या उपाध्यक्षा सौ रेणुका ताई बंगाळे यांनी केले. या कार्यक्रमाला ज्येष्ठ कीर्तनकार शांतीब्रम्ह मारोती बाबा कुरेकर आणि हरी भक्ती परायण संजय बाबा पाचपोर यांचेदेखील आशीर्वाद पत्र मिळाले होते. तेही वाचून सांगण्यात आले, या हिंदू संमेलन यशस्वी होण्याकारिता गोरेगाव उपखंड समिती आणि गोरेगाव उपखंड मधील समस्त हिंदू बांधवांनी प्रयत्न केले तर या हिंदू संमेलनाला गोरेगाव उपखंडातील अनेक हिंदू पुरुष, माता, भगिनी आणि तरुण मंडळी उपस्थित होते. सामूहिक पसायदान आणि महाप्रसादाने संमेलनाची सांगता झाली.

# उज्ज्वल इंग्लीश स्कूलमध्ये स्नेहसंमेलन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ फेब्रुवारी**




शहरातील उज्ज्वल इंग्लिश स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहपूर्ण आणि दिमाखदार वातावरणात पार पडले. प्लेग्रुप ते इयत्ता आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थित पालक, मान्यवर पाहुणे व शिक्षकांचे मन जिंकले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा रंगतदार आविष्कार पाहायला मिळाला.

यावेळी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप मोदे, प्राचार्य पंडित शिंदे तसेच जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संदीप दर्पलवार कार्यक्रमाची प्रस्तावना विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत पाईकराव यांनी केली. त्यांनी विद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले. गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच संस्कार, सर्जनशीलता आणि सामाजिक जाणीव यांना समान महत्त्व देणे ही विद्यालयाची प्राथमिकता असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मीनाक्षी बालकमल यांनी केले. यावेळी रेल्वे विभागाचे अभियंता सर्वेश कुमार, नगरसेविका ज्योती बलखंडे, नगरसेवक कैलाश बलखंडे, ज्योती जोंधळे, डॉ. मयूर कोंडेवार, शैलेश नांदेडकर, अमोल देशमुख, संस्थेचे सचिव उज्ज्वल पाईकराव, निर्मिती पाईकराव तसेच विद्यालयाच्या मुख्याध्यापिका प्रगती व्यास यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक, शिक्षिका यांनी परिश्रम घेतले.

# आदर्श शिक्षक एम एम राऊत, गव्हाणकर यांना समाजरत्न पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ फेब्रुवारी**




राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक एम एम राऊत आणि सामाजिक कार्यकर्ते देवरत्न गव्हाणकर यांना उल्लेखनीय कार्यालबद्दल पुणे येथील एका दैनिकाच्यावतीने समाजरत्न पुरस्कार दि १९ फेब्रुवारी रोजी प्रदान करण्यात आला.

शिवछत्रपती जयंती निमित्त हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे सदस्य, तथा भक्तीवेदांत रिसर्च सेंटरचे डायरेक्टर संजय भोसले, तर प्रमुख पाहुणे म्हणून दगडुसेठ हलवाई गणपतीचे ट्रस्टी सुनील रासणे, डॉ भावार्थ देखणे, अॅड काळूराम भूजबळ, भाजपा प्रवक्ते संदीप खेर्डेकर, दौलतराव शितोळे, सुनील शिंदे, प्रशांत गांधी, बाजीराव पाटील आदींची उपस्थिती होती. यावेळी राज्यातील ५४ व्यक्तींना उल्लेखनीय कार्याबद्दल समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी संपादक डी के लोखंडे यांनी मान्यवरांचे आभार मानले. एम एम राऊत यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल ज्येष्ठ पत्रकार डॉ विजय निलावार, अॅड राजेंद्र अग्रवाल, सुभाष नागरे, ओम राऊत, पी आर हेंबाडे, सुर्यकांत राजुलवार, प्रकाश ठाकरे यांनी अभिनंदन केले आहे.

# प्रलंबित कामांना वेग देण्याचे आदेश; किनवटमध्ये जिल्हाधिकाऱ्यांचा थेट आढावा



**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २१ फेब्रुवारी-**
उपविभागीय अधिकारी कार्यालय, किनवट येथे विविध विभागांच्या महत्त्वाच्या विकासकामांचा व्यापक आढावा बैठक पार पडली. बैठकीस जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत लोअर पैनगंगा प्रकल्पाच्या भूसंपादन व पुनर्वसन प्रक्रियेचा सखोल आढावा घेऊन प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्याच्या सूचना देण्यात आल्या. राष्ट्रीय महामार्ग १६१अ रस्त्याच्या कामाची प्रगती तसेच गोकुंदा रेल्वे गेट परिसरातील रोड ओव्हरपास समस्यांवर राष्ट्रीय महामार्ग विभाग व रेल्वे अधिकाऱ्यांसोबत चर्चा करण्यात आली.

टीएसपी योजनेअंतर्गत अंतिम टप्प्यातील वितरण यादी जिल्हाधिकारी व प्रकल्प अधिकारी कार्यालयास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. सबलीकरण योजना, राणी दुर्गावती योजना आणि वनहक्क कायद्याच्या अंमलबजावणीचा आढावा घेऊन आयएफआर लाभार्थी शेतकऱ्यांची ओळखपत्र निर्मिती गतीमान करण्यावर भर देण्यात आला.

सहस्त्रकुंड व किनवट आश्रम शाळांतील पाणीटंचाई, जमिनीच्या मालकीचे प्रश्न, तसेच घोगरवाडी व वाघदरीकडे जाणाऱ्या रस्त्यासह आदर्श आदिवासी गाव विकासाचा आढावा घेण्यात आला. अमृत आहार योजना, आश्रम शाळांतील वैद्यकीय किट वाटप, आकांक्षा ब्लॉक कार्यक्रम पुनरावलोकन तसेच मनरेगा अंतर्गत मृदसंवर्धन कामांवर चर्चा झाली.

याशिवाय माहूर मंदिर विकास प्रगती, शक्तिपीठ महामार्ग अलाइनमेंट, किनवट शहरातील छत्रपती शिवाजी महाराज कायद्यातील जमीन प्रकरण, शहर स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन आराखडा यांचाही आढावा घेण्यात आला.

बैठकीस सहायक जिल्हाधिकारी तथा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी जेनित चन्द्रा दोन्तुला, आदिवासी विकास, महसूल, कृषी, आरोग्य, महिला व बालकल्याण, नगरपालिका प्रशासन, सार्वजनिक बांधकाम, राष्ट्रीय महामार्ग, पाणीपुरवठा आदी विभागांचे अधिकारी उपस्थित होते. विविध प्रकल्पांची कामे गतीने व नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

# बाऱ्हाळी येथे जगद्‌गूरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या पादुका दर्शन सोहळ्याचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी, दि. २१ फेब्रूवारी-**
जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी संस्थान नानिजच्या अंधश्रद्धा निर्मूलन उपक्रमा अंतर्गत जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या बा-हाळी येथे दि.२४फेब्रुवारी २६ रोज मंगळवारी पादुका दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे .



जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी संस्थान नानिजधाम च्या वतीने देशासह राज्यात विविध सामाजिक, आरोग्य विषयक , मोफत ईंग्रजी माध्यमातून शिक्षण , मोफत वेद पाठशाळा ,रक्तदान ,मरणोत्तर देहदान ,अवयवदान ,पर्यावरण ,धार्मिक, अंधश्रद्धा निर्मूलन यासारखे विविध उपक्रम राबविण्यात येत असतात अंधश्रद्धा निर्मूलन या उपक्रमा अंतर्गत न बा-हाळी ता. मुखेड जि.नांदेड (द.)येथे दि २४ फेब्रुवारी मंगळवारी जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या सिद्धपादुका दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले असून त्या अनुषंगाने उदगीर रोड , भवानी पेट्रोल पंपाच्या पाठीमागे उमाटे पाटील यांच्या शेतात सदर कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे .सकाळी ८ वा.शहरातून भव्य मिरवणूकीने पादुका संतपिठावर स्थापना,गूरुपूजन,उपासक दिक्षा,आरती सोहळा,पुष्पवृष्टी,प्रवचनकाराचे अम्रततूल्य प्रवचन,दर्शन ,सामाजिक उपक्रम असा भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास नांदेड जिल्ह्यसह लातूर जिल्ह्यातील उदगीर ,जळकोट तालुक्यातून २५ ते ३० हजार भाविक भक्त उपस्थित राहणार असल्याची माहिती तेलंगणा पिठ प्रमुख तथा जिल्हा निरीक्षक काकासाहेब वनारसे यांनी दिली आहे. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विविध प्रकारच्या समीती गठीत करण्यात आले आहेत.सर्वांना महाप्रसाद ,पार्किंग व्यवस्था ,पिण्याचे शूध्द पाणी,भव्य मंडप उभारणी करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील भाविक भक्तांनी जगद्गूरू रामानंदाचार्यजी नरेंद्राचार्यजी यांच्या बा-हाळी येथील पादुका दर्शन सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा सेवा समीती नांदेड (दक्षिण),तालुका सेवा समीती मूखेड व उत्सव समीती ,कार्य समीती बा-हाळीच्या वतीने करण्यात आले आहे.

# तीन गावात हातभट्टी दारूचे अड्डे उध्वस्त; सतरा हजार रुपयाचे साहित्य नष्ट

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. २१ फेब्रूवारी-**
माहूर तालुक्यात आज एकाच दिवसात तीन गावात पोलिसांनी धाडी टाकून साडेसतरा हजार रुपयांचे दारू बनविण्याचे ३५० लिटर मोहफुलाचे फसफसते रसायन व साहित्य नष्ट करण्यात करत तिघांवर गुन्हे दाखल केले आहेत.या धडक कारवाईमुळे अवैध छुप्या पद्धतीने अवैध हातभट्टी दारू बनविण्याचे काम करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.




पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप, पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी किरण कुमार भोंडवे यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी कठोर कारवाईचा बडगा उचलला असून, याकामी पोलीस निरीक्षक देविदास चोपडे हे स्वतः कमान हाती घेत आपल्या सहकाऱ्यांच्या समवेत मैदानात उतरले आहेत. याबाबत माहिती मिळताच माहूर तालुक्यातील ग्रामीण भागातील अवैध देशी दारू विक्री व हातभट्टी दारू अड्ड्यावर छापा टाकून धडक करत गुन्हे दाखल करण्यात येत आहेत.दि. २१ फेब्रुवारी रोजी खबऱ्याकडून पक्की माहिती मिळताच पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांनी स्वतः पोलिसांसमवेत इवळेश्वर येथील नाल्यात धाड टाकून ५० लिटर दारूबविण्याचे फसफसते रसायन तसेच कसारपेठ येथे २०० लिटर तर वानोळा येथे १०० लिटर मोह फुलाचे फसफसते रसायन व इतर साहित्य असे मिळून एकूण १७ हजार ५०० रुपयांचे रसायन आणि साहित्य नष्ट करून तिघांवर गुन्हे दाखल केले आहेत.

ही धडक कारवाई पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्या नेतृत्वाखाली पोहेका प्रकाश गेडाम, पोहेका गजानन चौधरी, पोका पवन राऊत, पिठलेवाड, रणमले, राठोड यांनी यशस्वीपणे पार पाडली असून ठाणे आमलदार सौ. पुष्पा पुसनाके यांनी गुन्हे दाखल केले आहेत.

## आनंदी चांदणे ललित काव्यसंग्रहाचा रविवारी प्रकाशन सोहळा

**नांदेड**-शहरातील नवोदित कवयित्री निलम नांदेडकर (कुलकर्णी) यांच्या आनंदी चांदणे या ललित काव्यसंग्रहाचे रविवारी दि.२२ फेब्रुवारी रोजी मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले



आहे. जीवनातील आलेले अनुभव.. समाजातील संवेदनशीलता.. निसर्ग...जीवन शैली.. आदी विषयावरच्या त्यांच्या या कविता आहेत.या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सुप्रसिद्ध कवयित्री व स्त्री रोग तज्ञ डॉ.वृषाली किन्हाळकर व प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ साहित्यिक व रंगकर्मी डॉ.जीवन पिंपळवाडकर, ज्येष्ठ मानसोपचार तज्ञ डॉ.दिगंबर भास्करराव जोशी यांच्या उपस्थितीत हा प्रकाशन सोहळा दि.२२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता शिवाजीनगर येथील हॉटेल अतिथी येथे संपन्न होणार आहे. या कार्यक्रमास निमंत्रितांनी उपस्थित राहण्याचे आवाहन निलम प्रसाद नांदेडकर (कुलकर्णी) व प्रसाद प्रकाशराव नांदेडकर यांनी केले आहे.

## खुशी सेवाभावी संस्थेच्या वतीने शिवजयंतीनिमित्त महाप्रसादाचे वाटप

**देगलूर**- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त खुशी सेवाभावी संस्थेच्या वतीने महाप्रसाद अन्नदानाचे आयोजन यशस्वीपणे संपन्न झाले. संस्थेचे अध्यक्ष तथा नगरसेवक एकनाथ (बबलू) टेकाळे व



अनिल टेकाळे यांच्या पुढाकाराने झालेल्या या उपक्रमाला हजारो शिवभक्तांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महाप्रसादाच्या शुभारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. एकनाथ टेकाळे यांच्या हस्ते नारळ फोडून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. व यावेळी बालाजी पाटील खतगावकर (माजी प्रशासकीय अधिकारी, नगराध्यक्षा विजयमाला बालाजी टेकाळे, लक्ष्मीकांत पदमवार (माजी नगराध्यक्ष) बालाजी टेकाळे (माजी उपनगराध्यक्ष), अंकुश देसाई उपनगराध्यक्ष, पोलीस निरीक्षक मारोती मुंडे, बुद्धू टेकाळे, नामदेव पाटील थडके (शिवजन्मोत्सव समिती अध्यक्ष), नगरसेवक नंदू शाखावर, नगरसेवक सुमंत कांबळे, बालाजी थडके, देगावकर, द्याळे आप्पा, यांच्या हस्ते महाप्रसादाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज की जय ! अश्या घोषणा देण्यात आल्या. या कार्यक्रमात शिवभक्त, सामाजिक कार्यकर्ते आणि महिलांसह हजारो नागरिकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी महाप्रसाद कार्यक्रमाला खुशी सेवाभावी संस्थेचे अनिल टेकाळे, संपादक गजानन टेकाळे, संतोष नाईकवाड, गंगाधर उल्लेवार, पंकज कद्रेकर, शिरू महाराज, संजू बंधमवार, बालू पाटील, आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अखेरीस एकनाथ (बबलू) टेकाळे यांनी महाप्रसादाचा लाभ घेतलेल्या सर्व शिवभक्तांचे आणि सहकाऱ्यांचे आभार मानले.

## नंदगाव तांडा येथे जलधारा केंद्रस्तरीय सामने

**इस्लापूर** -किनवट तालुक्यातील जि प प्रा शाळा नंदगाव तांडा येथे दिनांक १७ व १८ फेब्रुवारीला जलधारा केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सव संपन्न झाला. केंद्रातील जलधारा, सावरगाव



तांडा, नंदगाव तांडा, रिठा तांडा, जलधारा तांडा, सावरगाव, नंदगांव , पांडुरंग नगर,रिठा, भुजंगनगर व अतिदुर्गम भागातील वाघदरी, मांजरी माथा या शाळांनी सहभाग नोंदवला. दोन दिवसीय चाललेल्या या क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नंदगाव तांडा ने (जनरल चॅम्पियनशिप) सर्वसाधारण जेतेपद पटकावल्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक विजय काळे, शिक्षिका रोहिणी घुमे, प्रविण अंबालकर, महेश म्हंकराज, स शि प्रविण बावस्कर यांचे व सर्व विद्यार्थ्यांचे सरपंच देविदास मोहन जाधव, उपसरपंच इंद्रसिंग आडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष गिरधारी शंकर पवार, उपाध्यक्ष सुनील गजानन जाधव, तंटामुक्त अध्यक्ष बालाजी राठोड, पोलीस पाटील रविंद्र राठोड, ग्रा. पं. सदस्य लखन आडे,माजी सरपंच सुनील आडे व ग्रामस्थांनी सत्कार करून अभिनंदन केले. कार्यक्रमाची सांगता सर्वांना पेढे वाटून केली.

# टाळ,मृदंग, लेझीमच्या जल्लोषात शिवजयंती सोहळा साजरा

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. २१ फेब्रूवारी-**
टाळ- मृदंग ..लेझीम शहरात भगवमय वातावरण.. आकर्षक रोषणाई ..फाटक्यांची अतिषबाजीकरत छत्रपती शिवाजी महाराज यांची आनंदमय वातावरणात जयंती साजरी करण्यात आली.आ. प्रताप पाटील चिखलीकर यांच्या हस्ते जून्या शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिषेक झाल्यानंतर भव्य-दिव्य शिवजयंती मिरवणूकीस आरंभ झाला.

लोहा शहरात भव्य-दिव्य शिवजन्मोत्सव सोहळा आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या पुढाकाराने साजरा केला जातो. मुख्य चौकातील शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्यास नेत्रदीपक रोषणाई व सजावट करण्यात आली होती छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास आ. प्रतापराव पाटील चिखलीकर माजी , सुभाष साबणे युवा नेते प्रविण पाटील चिखलीकर, नगराध्यक्ष शरद् पवार सचिन पाटील चिखलीकर मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे, उपनगराध्यक्ष करीम शेख, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम ,

माजी उपनगराध्यक्ष दता वाले व मान्यवरांनी पुष्यअर्पण करून अभिवादन केले.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास आ. प्रतापराव पाटील,माजी आ साबणे , युवा नेते प्रवीण पाटील पाटील चिखलीकर नगराध्यक्ष शरद पवार, केशवराव मुकदम

यांच्या हस्ते अभिषेक केल्यानंतर शिवरायांच्या पुळ्यास प्रतापराव पाटील , नगराध्यक्ष शरद पवार भास्कर पवार जयंती मंडळ सुधाकर पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून मिरवणुकीस आरंभ झाला ,

उपनगराध्यक्ष करिम शेख, , माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम माजी सभापती आनंदराव पाटील नगरसेवक हरिभाऊ चव्हाण जयंती मंडाचे अध्यक्ष सुधाकर पाटील, पोलीस निरिक्षक नागनाथ आयलाने, मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे, नगरसेवक गणेश बगाडे, सतीश निखाते बी डी जाधव, केतन खिल्लारे, काळे गुरुजी, अभंग पाटील, भानुदास पाटील, हणमंत पवार, श्रीकांत पाटील, सहभागी झाल होत. अनिल धुतमल यांनी वाहन सजावट केली होती.मंडळाचे अध्यक्ष सुधाकर पाटील व सहका-यांनी जयंती साजरी करण्यासाठी अतोनात परिश्रम घेतले.

# शिस्तबद्ध वातावरणात दहावी परिक्षेला प्रारंभ; प्रशासनाच्या दक्षतेने परिक्षा सुरळीत

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. २१ फेब्रूवारी-**
नायगांव तालुक्यातील दहावीच्या परीक्षेचा पहिला पेपर अत्यंत शांत व शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. एकूण ३ हजार १८० विद्यार्थी नोंदणीकृत असून त्यापैकी ३ हजार १२० विद्यार्थी उपस्थित राहिले, तर ६० विद्यार्थी अनुपस्थित राहिल्याची माहिती परीरक्षा केंद्र कार्यालयाकडून देण्यात आली. प्रशासनाची दक्षता आणि केंद्रप्रमुखांच्या नियोजनामुळे परीक्षा सुरळीत झाली.

तालुक्यातील विविध परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांची उपस्थिती समाधानकारक होती. श्री साईबाबा विद्यालय शंकरनगर येथे १२८ पैकी १२५, गो.म.प. स्कूल शंकरनगर येथे १३७ पैकी १३६, श्री शिवाजी माध्यमिक विद्यालय हळदा येथे २२६ पैकी २२२, जि. नेहरू विद्यालय बरबडा येथे ३२७ पैकी ३२३ आणि जि.प. हायस्कूल धुंगराळा येथे १८९ पैकी १८३ विद्यार्थी उपस्थित होते.

पोष्ट. बेसीक. आश्रम. शाळा मरवाळी तांडा केंद्र येथे ३७८ पैकी ३६८ विद्यार्थी



उपस्थित राहिले असून येथे सर्वाधिक १० विद्यार्थी अनुपस्थित होते. तसेच जनता हायस्कूल नायगांव (३४४ पैकी ३४३) व यमुनाबाई माध्यमिक विद्यालय नायगांव (२७५ पैकी २७४) येथे प्रत्येकी एक विद्यार्थी गैरहजर होता.

याशिवाय जि.प. हायस्कूल कुंटूर (२३६ पैकी २३१), शंकरराव विद्यालय कोलंबी (२४२ पैकी २३७), ब्ल्यू बेल्स स्कूल नायगाव (१६९ पैकी १६७), मा.आ. शा. कुटूर तांडा (३२८ पैकी ३१३) व राणी लक्ष्मीबाई के.वि. नरसी (२०१ पैकी १९८) या केंद्रांवरही काही विद्यार्थ्यांची अनुपस्थिती नोंदविण्यात आली.

परीक्षा सुरळीत पार पडण्यासाठी प्रशासन सतर्क होते. आनंद रेंनगुंटवार व एस.डी. पाचलिंग यांनी यासंदर्भातील माहिती दिली. तसेच कोलंबी परीक्षा केंद्राला सुरेश पाटील, उद्धव ढगे व त्र्यंबक स्वामी यांनी भेट देऊन पाहणी केली.

दरम्यान, नायगाव पंचायत समिती चे गटशिक्षणाधि कारी सुरेश पाटील यांनी विद्यार्थ्यांना आत्मनिर्भरते चा संदेश दिला. विद्यार्थ्यांनी केलेल्या तयारीवर विश्वास ठेवून आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जावे. कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार न करता मनाची तयारी करून प्रामाणिकपणे परीक्षा दिल्यास यश हमखास मिळेल, असे त्यांनी सांगितले.

बारावीबरोबरच दहावीच्या परीक्षेलाही वीस तारखेपासून सुरुवात झाली असून पहिल्याच दिवशी नायगाव तालुक्यात सकारात्मक आणि शिस्तबद्ध वातावरण अनुभवायला मिळाले. विद्यार्थ्यांचा उत्साह, पालकांचा पाठिंबा आणि प्रशासनाची दक्षता यामुळे परीक्षेचा पहिला टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण झाला आहे.

# 'शंकर कन्स्ट्रक्शन'ची कामे वादाच्या भोवऱ्यात

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २१ फेब्रूवारी-**
मुदखेड शहरात सध्या सुरू असलेली विविध विकासकामे अत्यंत निकृष्ट दर्जाची होत असल्याचा आरोप करत, या कामांची तांत्रिक चौकशी होईपर्यंत संबंधित कंत्राटदाराची बिले अदा करू नयेत, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी शहराध्यक्ष मोहम्मद बुर्हाण यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी दि.२० फेब्रुवारी रोजी नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांना लेखी निवेदन सादर केले.

शहरात सध्या शंकर कन्स्ट्रक्शन या कंपनीमार्फत विविध विकासकामे राबविली जात आहेत. मात्र, ही कामे




करताना नियमांची पायमल्ली होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. अंदाजपत्रकाकडे दुर्लक्ष: विकासकामे इस्टिमेशन नुसार केली जात नसून, केवळ थातूरमातूर पद्धतीने काम उरकले जात आहे. 'बी ओ क्यू' आणि तांत्रिक मार्गदर्शिका पुस्तकातील नियमांचा कोणताही अवलंब कंत्राटदाराकडून केला जात नाहीये.

तांत्रिक निकषांना हरताळ फासल्यामुळे शासनाच्या लाखो रुपयांच्या महसुलाचा चुराडा होत आहे.यासाठी मोहम्मद बुर्हाण यांनी निवेदनात आग्रही मागणी केली आहे की, जोपर्यंत तांत्रिक विभागाद्वारे या सर्व कामांची सखोल चौकशी होत नाही, तोपर्यंत शंकर कन्स्ट्रक्शनची कोणतीही देयके (बिले) काढू नयेत. जर चौकशीत ही कामे निकृष्ट आढळली आणि कंत्राटदार दोषी सिद्ध झाला, तर त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, असेही त्यांनी नमूद केले आहे.या निवेदनामुळे मुदखेड नगरपरिषद प्रशासनात आणि कंत्राटदार वर्तुळात मोठी खळबळ माजली आहे. आता प्रशासन यावर काय पाऊल उचलते, याकडे शहराचे लक्ष लागले आहे.



**आदमपूर - बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूरसह परिसरातील अटकळी, टाकळी,जुने,नवे,गळेगांव, थडीसावळी,केरूर,मुतन्याळ,मिनकी, खतगांव,केसराळी, हिप्परगा थडी आदि गावांतील शेत शिवारात हरभरा पीक कापणीला वेग आल्याचे सद्यस्थितीत चित्र आहे.**

# आयआयबी करीअर इन्स्टिट्यूटची जेईईमध्ये दमदार सुरुवात

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २१ फेब्रूवारी-**
जेईई मेन्सच्या पहिल्याच अधिकृत निकालात आयआयबी करिअर इन्स्टिट्यूटने उल्लेखनीय यश संपादन करत राज्यात आणि देशभरात आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. एकूण ४३ विद्यार्थ्यांनी ९५ पेक्षा जास्त पर्सेंटाईल, तर ७९ विद्यार्थ्यांनी ९० पेक्षा जास्त पर्सेंटाईल मिळवून संस्थेची भक्कम शैक्षणिक पायाभरणी अधोरेखित केली आहे. १९९९ साली स्थापना झालेल्या आयआयबी करिअर इन्स्टिट्यूटने नीट परीक्षेत यापूर्वी उच्चांक प्रस्थापित केला असून, दोन वर्षांपूर्वी सुरू केलेल्या जेईई विभागातही यशस्वी पदार्पण केले आहे.

मोजक्या विद्यार्थ्यांच्या विशेष बॅचेस असूनही मिळालेल्या या यशामुळे विद्यार्थी, पालक आणि शैक्षणिक क्षेत्रातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. संस्थेने स्पष्ट केले की, जेईई टीममध्ये आयआयटी व एनआयटीमधून उच्च शिक्षण घेतलेले अनुभवी प्राध्यापक कार्यरत असून त्यांची अध्यापनशैली, सूक्ष्म शैक्षणिक नियोजन आणि सातत्यपूर्ण सराव पद्धती याचेच हे फलित आहे. पुढील टप्प्यात विद्यार्थ्यांना आयआयटी ॲडव्हान्स परीक्षेसाठी अधिक सक्षमपणे तयार केले जाणार असल्याचेही संस्थेने सांगितले. संस्थेचे संचालक

Since 1999
IIB
INSPIRE • IGNITE • BELIEVE

दशरथ पाटील म्हणाले, विद्यार्थी आणि पालकांचा विश्वास हीच आमच्या मेहनतीची प्रेरणा आहे. येत्या काळात जेईई निकालाचा टक्का अधिक वाढवण्यावर आमचा भर राहील. या निकालात कुमारी अंजली (९९.५९), अग्रवाल कृष्णा (९९.५७), बरगळ आयुष (९९.५७), कदम आनंदा (९९.२१), पाचपिंड ओम (९८.९६), रामपूरकर यश (९८.८३), भिसे विशाल (९८.८१), कराळे रुतुराज (९८.७६), पाटील यशराज (९८.७१), गोरे रुद्रप्रताप (९८.७०), सूर्यवंशी सार्थक (९८.५४), ब्याळे गणेश (९८.५१), मुजतबा शाहेर (९८.४६), घाटे ऋग्वेद (९८.४१), रोडे दीपाराज (९८.३५), शिरसाठ ओम (९८.३०), देशमुख अर्जुन (९८.२५), चिलकावर श्रद्धा (९८.२२), गोयल शशांक (९८.१९), तराळे आर्यन (९८.१५), मोरे अथर्व (९८.१०), मारडोडे अश्वक (९८.०४), पुंड ऋषिकेश (९८.००) यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. इयत्ता ६वी ते १२वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी फाउंडेशन, आयआयटी-जेईई, नीट आणि एमएचटी-सीईटी या सर्व अभ्यासक्रमांची सुविधा आयआयबीमध्ये उपलब्ध आहे. मर्यादित संख्येच्या स्पेशल बॅचेससाठी थेट प्रवेश प्रक्रिया सुरू असून गुणवत्तेसोबतच विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देणे हे संस्थेचे धोरण असल्याचेही सांगण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांना उज्वल भविष्याचा मार्ग दाखवणे आणि स्पर्धात्मक जगात सक्षम बनवणे हेच आयआयबीचे मूळ उद्दिष्ट असल्याचे टीम आयआयबीने सांगितले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### नव्या ब्रँडचा शुभारंभ जाहीर

**छत्रपती संभाजीनगर :** पर्नोड रिकार्ड इंडिया ने महाराष्ट्रात सीग्राम्स एक्सक्लेमेशन! या नव्या ब्रँडचा शुभारंभ जाहीर केला आहे. गेल्या ३० वर्षांतील कंपनीची ही सर्वात महत्त्वाकांक्षी आणि नाविन्यपूर्ण घोषणा मानली जात आहे. सिग्राम्स एक्सक्लेमेशन! हा भारतातील एकमेव असा ब्रँड पोर्टफोलिओ आहे, ज्यामध्ये एकाच ब्रँडअंतर्गत पाच वेगवेगळ्या स्पिरिट्स प्रकारांचा समावेश आहे, व्हिस्की, व्होडका, जिन, रम आणि ब्रँडी. हे सर्व प्रकार प्रीमियम ॲडमिक्स सेगमेंटमध्ये समान किंमत श्रेणीत उपलब्ध असतील. हा ब्रँड एंट्री-लेव्हल प्रीमियम किंमत श्रेणीतील मोठ्या संधीच्या पार्श्वभूमीवर धोरणात्मक पद्धतीने सादर करण्यात आला असून, भारतातील वेगाने वाढणाऱ्या तरुण प्रौढ ग्राहकवर्गाला लक्षात घेऊन तयार करण्यात आला आहे.

### कोल्हापूर, पश्चिम महाराष्ट्र औद्योगिक वाढीच्या पुढील टप्प्याचे नेतृत्व करणार : अडवाणी

**छत्रपती संभाजीनगर :** कोल्हापूर पश्रि्चम महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे औद्योगिक केंद्र म्हणून झपाट्याने उदयास येत आहे. राज्यातील टियर-२ शहरे भारताच्या उत्पादन क्षेत्रातील पुढील वाढीची लाट पुढे नेत आहेत. ही केवळ मेट्रो शहरांच्या पलीकडील वाढ नसून, अधिक सक्षम आणि विविधीकृत मूल्यसाखळ्या निर्माण करण्याची संरचनात्मक बदलाची प्रक्रिया आहे, असे प्रतिपादन सीआयआय (पश्चिम विभाग) चे उपाध्यक्ष वीर एस. अडवाणी यांनी कोल्हापूर येथे झालेल्या माध्यम संवादात केले. सीआयआय (Confederation of Indian Industry) च्या पश्रि्चम विभागाचे उपाध्यक्ष तसेच ब्ल्यू स्टार लिमिटेडचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक असलेल्या अडवाणी यांनी सांगितले की, मजबूत औद्योगिक पाया, कुशल मनुष्यबळ आणि विकसित पायाभूत सुविधा यांच्या जोरावर महाराष्ट्राने देशाच्या औद्योगिक वाढीत नेहमीच आघाडी घेतली आहे.आता पुढील टप्प्यात मेट्रो शहरांपलीकडे औद्योगिक क्षमता विस्तारण्याची गरज आहे. कोल्हापूर, पुणे, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर यांसारख्या शहरांना राष्ट्रीय आणि जागतिक मूल्यसाखळ्यांमध्ये प्रभावीपणे जोडणे आवश्यक आहे. खर्च नियंत्रण, मूल्यवर्धन, नवोपक्रम आणि विश्र्वासार्ह पुरवठा साखळी यांवर भर देणे गरजेचे आहे, असे अडवाणी म्हणाले.

### इंडिया एआय मिशन शी सुसंगत स्केलेबल युनिफाइड एआय प्लॅटफॉर्म उभारणार

**छत्रपती संभाजीनगर :** नवी दिल्ली येथे सुरू असलेल्या इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६ च्या पार्श्र्वभूमीवर टेक सोल्युशन्स लिमिटेड ने आज एक व्यापक युनिफाइड एआय प्लॅटफॉर्म विकसित करण्याच्या आपल्या धोरणात्मक योजनेची घोषणा केली. आरोग्य क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवण्यासाठी डिझाइन करण्यात आलेला हा प्लॅटफॉर्म एक एकात्मिक डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर लेयर म्हणून काम करेल, ज्यामुळे रुग्णालये, डायग्नोस्टिक प्रयोगशाळा, क्लिनिकल ट्रायल संस्था आणि क्लिनिक यांना कृत्रिम बुद्धिमत्ता उपाय सहजपणे स्वीकारता आणि वापरता येतील.ही पुढाकार टेक सोल्युशन्स च्या प्रवासातील एक परिवर्तनात्मक पाऊल ठरते आणि समाजाच्या व्यापक हितासाठी एआय ला एक महत्त्वाचे विकास साधन म्हणून पुढे नेण्याच्या भारत सरकारच्या प्रयत्नांशी सुसंगत आहे. देश ३७० अब्ज डॉलर्सच्या आरोग्य क्षेत्रासोबतच १९७ अब्ज डॉलर्सच्या प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा संधी उघडण्यावर लक्ष केंद्रित करत असताना, हा प्लॅटफॉर्म सर्वजन हिताय, सर्वजन सुखाय या समिटच्या मुख्य संकल्पनेला प्रतिबिंबित करतो, ज्यामुळे प्रगत तंत्रज्ञान प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचेल.

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'शतक' चित्रपटासाठी दिल्या खास शुभेच्छा

**पुणे :** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी प्रेक्षकांना 'शतक: राष्ट्रीय स्वयंसेवक संघ के १०० वर्ष' हा चित्रपट पाहण्याचे आवाहन केले आहे. शिस्त आणि राष्ट्रवादाची प्रेरणा देणारा हा चित्रपट असल्याचं त्यांनी सांगितलं आहे. 'शतक: राष्ट्रीय स्वयंसेवक संघ के १०० वर्ष' हा चित्रपट संघाचा विचारप्रवास, सामाजिक उपक्रम आणि देशसेवा यांचा आढावा घेतो. अलीकडेच प्रदर्शित झालेल्या ट्रेलरनंतर या चित्रपटाबद्दल मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. हा चित्रपट २० फेब्रुवारी २०२६ रोजी देशभरातील चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार आहे.

### भगवान शिवाची शक्ती साधण्यासाठी पूर्ण मौन धारण करतो

**छत्रपती संभाजीनगर :**सोनी सबवरील पौराणिक गाथा गाथा शिव परिवार की – गणेश कार्तिकेय भक्ती, सामर्थ्य आणि दिव्य ध्येयाची प्रभावी कहाणी रंगवत आहे. या मालिकेच्या केंद्रस्थानी आहे अविनेश रेखी, जो भगवान शिवाची भूमिका साकारत आहे. ही भूमिका केवळ प्रभावी उपस्थितीच नव्हे तर गहन शांततेचीही मागणी करते. अविनेश रेखीची तयारी दिग्दर्शक क्शन म्हणण्याच्या खूप आधीपासून सुरू होते. लाईट्स, भव्य वेशभूषा आणि क्रूच्या हालचालींच्या गडबडीत तो सेटवर काही शांत क्षण शोधतो. विशेष म्हणजे, निर्मिती टीमने खास सायलन्स रूम तयार केली आहे

### सुरक्षितता आणि भावना यांचा समतोल

**छत्रपती संभाजीनगर :** सोनी सबचा लोकप्रिय शो 'पुष्पा इम्पॉसिबल', जो आपल्या प्रेरणादायी कथेसाठी आणि प्रेक्षकांना जवळचा वाटणाऱ्या पात्रांसाठी ओळखला जातो, आता एक जबरदस्त सीक्वेन्स घेऊन येतो आहे. या सीनमध्ये पुष्पा (करुणा पांडे) आणि प्रार्थना (पूजा कटुर्डे) एकत्र बाइकवर दिसणार आहेत. हा सीन तणाव आणि भावनांनी भरलेला असून, त्यात तातडीची परिस्थिती आणि जबरदस्त इमोशन्स दाखवले आहेत. हा सीक्वेन्स कलाकारांसाठी भावनिक आणि शारीरिकदृष्ट्या खूपच आव्हानात्मक होता. सीनमध्ये पूजा कटुर्डेला बाइक चालवायची होती आणि करुणा पांडे त्यांच्या मागे बसल्या होत्या. स्क्रीनवर हा क्षण जितका रोमांचक दिसतो, तितकाच कठीण होता त्याचे शूटिंग. यासाठी अनेकदा रिहर्सल्स करण्यात आल्या, दोघींमध्ये योग्य समन्वय साधावा लागला आणि एकमेकींवर पूर्ण विश्वास ठेवावा लागला.

# हवामान बदलाचा आरोग्यावर गंभीर परिणाम

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २१ फेब्रुवारी :** वातावरणातील झपाट्याने होणारे बदल, वाढते तापमान, वाढते प्रदूषण आणि उष्णतेच्या लाटा यांचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत असल्याचे मेडिकवर हॉस्पिटलच्या तज्ज्ञांनी स्पष्ट केले. हवामान बदल हा केवळ पर्यावरणाचा विषय नसून तो सार्वजनिक आरोग्याचा गंभीर प्रश्र्न बनला आहे, असे त्यांनी सांगितले.

शरीरावर होणारे प्रमुख परिणाम

ताप, सर्दी, खोकला, उष्माघात आणि निर्जलीकरण यांसारख्या समस्या वाढताना दिसत आहेत. वाढत्या तापमानामुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होते. परिणामी चक्कर येणे, थकवा, रक्तदाब कमी होणे आणि गंभीर अवस्थेत उष्माघाताचा धोका निर्माण होतो.

**श्वसनाचे वाढते आजार**

प्रदूषण आणि धुळीचे प्रमाण वाढल्याने दमा, ॲलर्जी आणि ब्रॉन्कायटिस यांसारखे श्वसनाचे आजार वाढत आहेत. विशेषतः लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिक अधिक संवेदनशील असल्याचे तज्ज्ञांनी नमूद केले.

**हृदयविकाराचा वाढता धोका**

उष्णतेमुळे हृदयावर अतिरिक्त ताण येतो. त्यामुळे हृदयविकाराच्या झटक्यांची शक्यता वाढू शकते, असा इशाराही डॉक्टरांनी दिला.



**प्रतिबंधात्मक उपाय**

आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी खालील उपाय महत्त्वाचे असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले:

पुरेसे पाणी पिणे व हलका आहार घेणे. दुपारच्या कडक उन्हात बाहेर जाणे टाळणे. मास्कचा वापर करून प्रदूषणापासून संरक्षण करणे

**नियमित आरोग्य तपासणी करणे**

या पत्रकार परिषदेत डॉ. समिध पटेल, डॉ. आनंद देशमुख, डॉ. प्रसन्न देशमुख, डॉ. आनंददीप अग्रवाल व डॉ. अविनाश कचरे यांनी मार्गदर्शन केले. तसेच उपलब्ध आरोग्य सुविधांबाबत सेंटर हेड डॉ. विशाल कुटे यांनी सविस्तर माहिती दिली.

नागरिकांनी हवामान बदलाच्या पार्श्र्वभूमीवर स्वतःची आणि कुटुंबियांची काळजी घेणे अत्यावश्यक असल्याचे आवाहन करण्यात आले.

## स्वामी प्रणवानंद पुण्यतिथीनिमित्त वक्तृत्व स्पर्धेत संत ज्ञानेश्वर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे यश



**तभा वृत्तसेवा**

**कन्नड, दि. २१ फेब्रुवारी :** स्वामी प्रणवानंद सरस्वती महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त कालीमठ (ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर) येथे विविध शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या अंतर्गत स्वामी प्रणवानंद माध्यमिक विद्यालय येथे तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा उत्साहात पार पडली.

या स्पर्धेत तालुक्यातील विविध शाळांमधील एकूण ३३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून आपले वक्तृत्व कौशल्य सादर केले. या स्पर्धेत श्री संत ज्ञानेश्वर विद्या मंदिर, शिवनगर येथील विद्यार्थिनी आकांक्षा दलपत चव्हाण हिने अत्यंत प्रभावी आणि अभ्यासपूर्ण वक्तृत्व सादर करत चतुर्थ क्रमांक पटकावला. तिच्या सादरीकरणाचे परीक्षकांकडून विशेष कौतुक करण्यात आले. या यशाबद्दल तिला रोख रक्कम १००१, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

तसेच याच शाळेचा विद्यार्थी आदित्य शरद धुमाळ यानेही आत्मविश्वासपूर्ण आणि प्रभावी भाषण सादर करून उपस्थितांची मने जिंकली. त्याला प्रमाणपत्र व मेडल देऊन सन्मानित करण्यात आले.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष साबुसिंग राठोड, उपाध्यक्ष रामदास सुरडकर, सचिव पांडुरंग राठोड, सहसचिव संजय पुरी, कोषाध्यक्षा सरला सोनवणे, संचालक शिवाजी वाघ, संचालक मुकुंद शिंदे तसेच मुख्याध्यापक प्रकाश जिरेमाळी यांनी विद्यार्थ्यांचे, पालकांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

या यशामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढला असून शाळेच्या शैक्षणिक व सांस्कृतिक परंपरेत आणखी एक मानाचा तुरा खोचला गेला आहे. भविष्यातही विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये असेच यश संपादन करावे, अशी अपेक्षा पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

## सीए क्षेत्रात एआयचा प्रभावी वापर करणार : सीए. अमोल गोधा

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २१ फेब्रुवारी :**

इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या छत्रपती संभाजीनगर शाखेच्या २०२६-२७ कार्यकाळासाठी सीए. अमोल गोधा यांनी अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारला असून, सीए व्यवसायात कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यावर भर दिला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

नवीन कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी सीए. केदार पांडे, सचिवपदी सीए. रफिक पठाण, खजिनदारपदी सीए. ऐश्र्वर्या ब्रम्हेचा, तर 'विकासा' विद्यार्थी शाखेच्या अध्यक्षपदी सीए. आनंद तोतला यांची निवड झाली आहे. सीए. समीर शिंदे आणि माजी अध्यक्ष सीए. महेश इंदाणी हे सदस्य म्हणून कार्यरत राहतील.

शाखेतर्फे सदस्य व विद्यार्थ्यांसाठी एआय-आधारित कार्यशाळा व प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असून, गुंतवणूकदार जागरूकता आणि करविषयक जनजागृती उपक्रमही राबवले जाणार आहेत. मराठवाड्यातील सीए विद्यार्थी व नवोदितांना तंत्रज्ञानस्नेही प्रशिक्षण देणे हे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.





सोयगाव :जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे दशसूत्री उपक्रमा अंतर्गत मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासोबत संस्कार मूल्य रुजवण्याचे काम केले जात आहे.मुलांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी व त्यांच्या वाचनामध्ये सातत्य यावे यासाठी माजी विद्यार्थी संघ यांच्याकडून शाळेसाठी संस्कारक्षम गोष्टींची पुस्तके वाटप करण्यात आली.माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष राजू कुडके,समाजसेवक शंकर जेठे, दत्तू जोहरे,शाळा व्यवस्थापन समिती सदस्य मनीषा जेठे, संध्या पगारे हे उपस्थित होते.शाळेचे मुख्याध्यापक रघुनाथ काटोले व सहशिक्षक गोपाल चौधरी यांनी त्यांचे आभार व्यक्त केले.

## दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल येथे शिवजयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन, दि. २१ फेब्रुवारी :**दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल येथे शिवजयंती कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून शाळेचे संस्थापक ओमप्रकाश जैस्वाल यांची उपस्थिती लाभली. तसेच पालकवृंद उपस्थित होते. प्रमुख अतिथींच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमासाठी विद्यार्थी छत्रपती शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांचे हुबेहूब पोशाख करून आले होते. शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणाद्वारे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन चरित्रावर माहिती सांगितली. कार्यक्रमाच्या वेळी शाळेच्या मुख्याध्यापिका दर्शना कोकणे, तसेच शिक्षकवृंद सुनिता चव्हाण, दिक्षा साबळे, नितीन मोरे, शितल कुमावत, नैना कहार, सुषमा वंजारे व सीमा वंजारे आदींनी उपस्थिती होती.

## खुलताबाद शहरात शिव प्रतिमेचे नगराध्यक्ष अमीर पटेल यांच्या हस्ते पूजन



**तभा वृत्तसेवा**

**खुलताबाद, दि. २१ फेब्रुवारी :**शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध ठिकाणी उत्साहपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. शहरातील भद्रा मारुती मंदिर परिसर, मोठी आळी, लहानी आळी, साळीवाडा व पानमळा या भागांत गिरीस्थान नगरपरिषदेच्या वतीने शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमांना नगराध्यक्ष सय्यद अमीर पटेल, उपाध्यक्ष नवनाथ बारगळ, नगरसेवक गजानन फुलारे, तोफिक शेख, वाजिद शेख, मोहन तुपे कैलास बारगळ योगेश बारगळ उमेश आवारे सचिन पवार कैलास फुलारे, नगर परिषदेचे कार्यालयीन अधीक्षक रुस्तुम फुलारे. जितेंद्र बोचरे. अंकुश भराड पाटील अप्पाराव देवकर गणेश रोटे शुभम देवकर अनिल फुलारे, कर्मचारी उपस्थित होते. यावेळी शिवप्रतिमेचे पूजन, अभिवादन व विविध सामाजिक संदेश देत नागरिकांच्या सहभागातून शिवजयंती साजरी करण्यात आली.

## एमजीएम विद्यापीठात उत्साहात शिवजयंती साजरी

### 'शिवस्वरूप' चित्रप्रदर्शनाचे उद्घाटन; रवींद्र जोगदंड यांचे व्याख्यान संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २१ फेब्रुवारी :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. इतिहास, संस्कृती आणि राष्ट्रपुरुषांविषयी अभिमानाची भावना विद्यार्थ्यांमध्ये दृढ व्हावी, या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमाला विद्यापीठातील मान्यवरांसह विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. स्मार्ट सिटी, छत्रपती संभाजीनगरचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र जोगदंड हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा.डॉ. विलास सपकाळ होते, तर कुलपती अंकुशराव कदम, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, सर्व अधिष्ठाता यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी 'शिवस्वरूप' या विशेष चित्रप्रदर्शनाचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या प्रदर्शनात छत्रपती शिवाजी महाराजांच्या विविध स्वरूपांचे दर्शन घडविणारी २२ चित्रे माहितींसह मांडण्यात आली होती. प्रत्येक चित्रासोबत ऐतिहासिक संदर्भ व वैशिष्ट्यपूर्ण माहिती देण्यात आल्याने विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विशेष आकर्षण ठरले ते म्हणजे इ.स. १८७० च्या दशकातील शिवाजी महाराजांचे अस्सल चित्र, जे प्रा. आशुतोष पाटील यांच्या वैयक्तिक संग्रहातील असून प्रथमच विद्यापीठात प्रदर्शित करण्यात आले. या दुर्मीळ चित्रामुळे प्रदर्शनाला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले असून उपस्थितांनी त्याचे विशेष कौतुक केले. हे प्रदर्शन २५ तारखेपर्यंत सर्वांसाठी खुले राहणार आहे. उद्घाटनानंतर श्री. रवींद्र जोगदंड यांनी 'रयतेचे राजे छत्रपती शिवराय' या विषयावर प्रभावी व्याख्यान दिले. आपल्या व्याख्यानात त्यांनी शिवाजी महाराजांचे राज्यकारभार, लोककल्याणकारी धोरणे, स्वराज्याची संकल्पना आणि आधुनिक काळातील त्यांचे महत्त्व यावर सविस्तर प्रकाश टाकला. शिवाजी महाराज हे कुठल्याही एका जाती-धर्मापुरते मर्यादित नसून सर्व समाजघटकांना सोबत घेऊन



चालणारे लोकनेते होते, असे त्यांनी ठामपणे प्रतिपादन केले. त्यांच्या विचारांमधील लोकाभिमुखता आणि व्यवस्थापन कौशल्य आजच्या प्रशासनासाठीही मार्गदर्शक ठरू शकते, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व भूमिका कार्यक्रम समन्वयक प्रा. आशुतोष पाटील यांनी मांडली. त्यांनी या प्रदर्शनामागील संकल्पना, ऐतिहासिक संदर्भ आणि विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्याचा उद्देश स्पष्ट केला. अध्यक्षीय भाषणात कुलगुरू प्रा.डॉ. विलास सपकाळ यांनी शिवचरित्रातील शौर्य, संघटनकौशल्य आणि लोकहिताची भावना विद्यार्थ्यांनी आत्मसात करावी, असे आवाहन केले.

या संपूर्ण कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सामाजिकशास्त्र संस्थेतील सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. नियोजनापासून ते प्रदर्शन उभारणी, पाहुण्यांचे स्वागत, व्याख्यानाचे आयोजन आणि विद्यार्थ्यांचा सहभाग सुनिश्रि्चत करण्यापर्यंत सर्व बाबींमध्ये त्यांनी सक्रिय भूमिका बजावली.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. ह. नि. सोनकांबळे यांनी केले. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत उत्साही व प्रेरणादायी वातावरणात पार पडला असून विद्यापीठात इतिहास आणि संस्कृतीविषयी नवचैतन्य निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# तिथी वार नक्षत्र योग करण हे पाच अंग मिळून पंचांग बनते - पंडित ऋषिकेश गुरुजी

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २१ फेब्रुवारी :** इंग्रजी वर्ष जसे एक जानेवारीला सुरू होते तसेच चैत्रशुद्ध प्रतिपदेला आपल्या मराठी नववर्षाची सुरुवात होते. मराठी कालगणना मराठी नवीन वर्ष यासंदर्भात आपल्या सर्व हिंदूंना सर्व बाबी माहित असणे अत्यंत आवश्यक आहे. हा भाग लक्षात घेऊन विश्र्व हिंदू परिषदेच्या मंदिर अर्चक पुरोहित आयाम आणि साईबाबा मंदिर ट्रस्ट ने ही पंचांगाची ओळख कार्यशाळा येथे ठेवली आहे.आपल्या घरातील व्यवसायातील शुभकार्य करण्याकरता आपण शुभमुहूर्त शोधतो हा शुभ मुहूर्त आपल्या पंचांगातील दिनशुद्धीवरून कळतो,दिनशुद्धी म्हणजे काय तर त्या दिवशीची तिथी शुद्ध आहे का? त्या दिवशीचा योग शुभ आहे का? हे पाहणे होय.

तिथी वार नक्षत्र योग आणि करण या पाच अंगांनी पंचांग तयार होते. या



पाचही अंगाची थोडी थोडी माहिती आपल्याला होणे आवश्यक आहे असे प्रतिपादन ज्योतिषाचार्य पंडित ऋषिकेश चौधरी यांनी केले ते शिवजयंतीच्या दिवशी दिनांक १९ मार्चला बजाज नगर परिसरातील साईबाबा मंदिरात आयोजित ओळख पंचांगाची या कार्यशाळेत बोलत होते यावेळी व्यासपीठावर प्रसिद्ध उद्योजक श्री राजेंद्र शिरोळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे वाळूज जिल्हा संघचालक श्री अनिल पाटील मंदिर आयामाचे प्रांत संपर्कप्रमुख राजीव जहागीरदार वाळूज जिल्हा पालक दामोदर घुगे वाळूज जिल्हा संपर्कप्रमुख संजीव तायडे श्री प्रदीप देशमुख श्री लक्ष्मण माने उपस्थित होते.

यावेळी बोलताना ते पुढे म्हणाले प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत एकूण १५ तिथी आहेत.एका मराठी महिन्यात दोन पंधरवाडे असतात एक शुक्ल पक्ष दुसरा कृष्णपक्ष. प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत जो पंधरवडा असतो त्याला शुक्लपक्ष म्हटले जाते आणि त्यानंतर पौर्णिमेपासून अमावस्यापर्यंत जो पंधरवडा येतो त्याला कृष्णपक्ष म्हणतात. याशिवाय सात वार २७ नक्षत्र २७ योग आणि ११ करण या सर्वांची सविस्तर माहिती पंडित ऋषिकेश चौधरी यांनी दिली याशिवाय उपस्थित भाविकांच्या प्रश्नांची उत्तरेही त्यांनी दिली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मंदिर आयाम प्रांत संपर्कप्रमुख राजीव जहागीरदार यांनी ही कार्यशाळा ठेवण्यामागील भूमिका स्पष्ट केली आणि छत्रपती शिवाजी महाराजांवर आपले विचार व्यक्त केले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन वाळूज भाग संपर्कप्रमुख संजीव तायडे यांनी केले मधुकर कुलकर्णी यांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी श्री देवानंद पवार ध्रुवबाळ शिंदे दौलत फोडदे चंद्रकांत झमकडे यांनी मेहनत घेतली.


### जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब,**
**व. स्तर गंगापूर यांच्या न्यायालयात**

दि.कि. अर्ज क. ११४ / २०२६

अर्जदार :-१) संगीता सुरेश दणके, वय ४७ वर्षे, धंदा घरकाम,रा. समतानगर, गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) प्रियंका भ्र. आनंद शिंदे, वय ३१ वर्षे, धंदा घरकाम, रा. सावखेडा ता. गंगापूर जि. औरंगाबाद
३) प्राजक्ता भ्र. निलेश त्रिभुवन, वय.२९ वर्षे, धंदा. घरकाम, रा.समतानगर, गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद ४) सागर पि. सुरेश दणके, वय २६ वर्षे, धंदा. मजुरी, रा.समतानगर, गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद ५) शकुंतला भ्र. वसंतराव दणके, वय ८४ वर्षे, धंदा. घरकाम, रा. समतानगर, गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद

//विरूध्द//

गैर अर्जदार:- निरंक

प्रकरण:- भारतीय वारसा कायदा कलम ३७२ प्रमाणे सक्सेशन प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी, वरील अर्जदाराने या न्यायालयात सक्सेशन प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्यांचे विधीज्ञ श्री. व्ही. एस. मनोरकर यांच्या मार्फत अर्ज दाखलकेला असुन त्याची थोडक्यात हकीकत अशी की, सुरेश वसंतराव दणके हे
दि. ०८/११/२०२४ रोजी गंगापूर ता. गंगापुर येथे मयत झाले असून त्यांनाअर्जदार क. १ ही पत्नी असून अर्जदार क. २ व ३ हया विवाहीत मुली असूनअर्जदार क. ४ हा मुलगा आहे तसेच अर्जदार क. ५ ही मयताची आई आहे.

या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत सुरेश वसंतराव दणके हे श्री मुक्तानंद महाविदयालय येथे नौकरीत असतांना ते मयतझाले असून त्यांना डिजीआरजी, अर्जित रजा व जीपीएफ रक्कम असे एकुण मिळुन रक्कम ४२,१९,५६७ /- रूपये व्याजासह जमा असुन सदर रक्कम काढण्यासाठी श्री मुक्तानंनंद महाविदयालय यांनी सक्सेशन प्रमाणपत्राची मागणी केली. तसेच अर्जदार क. १ हिने मयताची पेंशन तिला मिळावी म्हणुन प्रस्ताव सादर केला असून तसा आदेश म्हणुन सदरचा अर्ज दाखल करण्यास अर्जदारांना कारण घडले आहे.त्याआर्थी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या सदरअर्जास व अर्जातील मागणीस कोणाचा काही आपक्षेप उजर असल्यास सबंधीतांनी त्यांचा आक्षेप उजर या न्यायालयात हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा, मुदतीनंतर आलेले आक्षेप उजर लक्षात घेतले जाणार नाहीत. व हे न्यायालयत अर्जदारांच्या हक्कात आदेश व त्यांनी केलेले विनंतीप्रमाणे सक्सेशन प्रमाणपत्र जारी करील. करीता सदरचे प्रगटन या न्यायालयाच्या सही शिक्कयानिशी दिले आहे.

दिनांक :- १८/०२/२०२६

**कनिष्ठ लिपिक.**

**आदेशावरून**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर**